दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य — संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार, दि.२५ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२८०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# ८२३ यूट्यूबर आणि ट्रॅव्हल ब्लॉगर पोलिसांच्या रडारवर!

संवेदनशील मुद्दे उघडकीस, तपास सुरू | बापरे! ‘आयएसआय’ सदस्य सक्रीय | पोलिसांनी ब्लॉगर्स-वर केंद्रीत केलं लक्ष

## हेरगिरीः ११ जणांना करण्यात आली अटक

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:युट्यूबर ज्योती मल्होत्रा पाकिस्तानसाठी हेरगिरी करत असल्याची धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात एकूण ११ लोकांना अटक केली आहे. त्यांची कसून चौकशी सुरू आहे. आता युट्यूबर्स आणि ट्रॅव्हल ब्लॉगर पोलिसांच्या रडारवर आले आहेत. एकट्या पंजाबमधील ८२३ यूट्यूबर्स आणि ट्रॅव्हल ब्लॉगर्सवर पोलिसांनी लक्ष्य केंद्रीत केलं आहे. ज्यांच्या यूट्यूब चॅनेल्स आणि ब्लॉग्सवर पाकिस्तानशी संबंधित कंटेंट आहे आणि जो शेजारी देशांमध्ये अधिक पसंत केला जातो, अशा कंटेंटची आता पोलीस तपासणी करणार आहेत.

पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी याबाबतची महत्त्वाची माहिती दिली आहे. विशेष तांत्रिक तज्ज्ञांची एक टीम या सर्व प्रकरणावर लक्ष ठेवून आहे. पंजाब हे सीमावर्ती राज्य आहे. पाकिस्तानशी लागून असलेली पंजाबची ५५३ किमी लांब सीमा असलेल्या भागात अनेक लष्करी तळे आणि संवेदनशील ठिकाणे आहेत. अशा ठिकाणांची माहिती जर सार्वजनिक झाली, तर ती राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका ठरू शकते. त्यामुळे आता पोलीस त्यांच्या पातळीवर या यूट्यूबर्स आणि ब्लॉगर्सची चौकशी करत आहेत, असं गौरव यादव यांनी सांगितलं.२०१९ मध्ये करतारपूर कॉरिडॉरचे देखील सर्वेक्षण करण्यात आले होते. पोलिसांनी हिसार येथील यूट्यूबर ज्योती मल्होत्राच्या संपर्कांचीही चौकशी सुरू केली आहे, जिच्यावर गुप्तचर कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे. २०१९ मध्ये देशभरातील अनेक मोठे यूट्यूबर्स आणि ट्रॅव्हल ब्लॉगर्स करतारपूरमध्ये आले होते. तपास यंत्रणांच्या अहवालात अनेक संवेदनशील मुद्दे समोर आले असून, यावर काम सुरू आहे.




### अहवालात महत्वाची नोट

पंजाब पोलिसांनी हे अकाऊंट्स बंद केल्यावर अहवालात महत्त्वाची नोट लिहिली होती. पाकिस्तानी एजन्सी ‘आयएसआय’चे सदस्य या अकाऊंट्सवर सक्रीय होते, असं या अहवालात नमूद करण्यात आलं होतं. गेल्या वर्षी पंजाब पोलिसांनी ४८३ सोशल मीडिया अकाऊंट्स बंद केले होते, जे गँगस्टर्सशी संबंधित होते.

### १२१ सोशल मीडिया अकाऊंट्स बंद

पंजाब पोलिसांनी १० एप्रिल २०२५ पर्यंत एकूण १२१ सोशल मीडिया अकाऊंट्स बंद केले आहेत. हे अकाऊंट्स परदेशात असलेल्या गँगस्टर्स आणि त्यांच्या नेटवर्कशी संबंधित पोस्ट्समधून माहिती शेअर करण्यासाठी आणि संवादासाठी माध्यम म्हणून वापरले जात होते. यात पाकिस्तानस्थित बब्बर खालसा इंटरनॅशनलचा प्रमुख हरविंदर सिंग उर्फ रिंदा, हरप्रीत सिंग उर्फ हॅप्पी पासियन, जीवन फौजी, अनमोल बिश्नोई, गोल्डी बरार आणि इतर गँगस्टर्सचे सोशल मीडिया अकाऊंट्स समाविष्ट होते.

# रिपाइंच्या वतीने मंत्री संजय शिरसाट यांचा भव्य सत्कार

नियोजन: रिपाइंचे जिल्हाभरातील पदाधिकारी उपस्थित

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:सामाजिक न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांचा आज रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या बशीरगंज बीड येथील रिपाइं जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला.

सामाजिक न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट बीड जिल्हा दौऱ्यावर आले असताना, त्यांनी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या बशीरगंज येथील रिपाइं जिल्हा मध्यवर्ती कार्यालयास आवर्जून सदिच्छा भेट दिली. यावेळी बशीरगंज चौकात जेसीबीने मोठा पुष्पहार घालून त्यांचे रिपाइंच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.बशीरगंज चौकातुन शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत रिपाइं कार्यालयापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली.



सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांचा रिपाइं कार्यालयात जिल्हाभरातील रिपाइं प्रमुख पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, महिला आघाडीच्या पदाधिकारी यांनी भव्य सत्कार केला. रिपाइं कार्यालयात भव्य सत्कार प्रसंगी मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, राज्यातील अनुसूचित-जाती, जमातीसाठी असलेल्या योजना प्रभावीपणे राबवित आहोत. रमाई घरकुल आवास योजना, विद्यार्थ्यांची स्वाधार योजना, परदेशी शिष्यवृत्तीसाठी शिष्यवृत्ती योजना यासह महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) माध्यमातून समाजाचे बळकटीकरण करण्यासाठी योग्य पावले आणि निर्णय घेण्याचे काम करीतच, सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा लाभ समाज बांधवांना मिळवून देण्यासाठी या पदाच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करणार आहे. यावेळी राजू जोगदंड, » पान २ वर

# शेरीचा तात्पुरता पूल खचला

नियोजन:भरपावसात वाहतूक पर्याय मार्गाने वळविली



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:येथील नगर-बीड मार्गावरील शेरी (बु.) येथे नवीन पुलाचे काम चालू असल्याने वाहतुकीसाठी तात्पुरता पर्याय रस्ता म्हणून तयार केलेला पूल सलग चालू असलेल्या पावसामुळे शनिवारी दुपारी खचल्यामुळे काही काळ या मार्गावरील वाहतुक कोंडी झाली. मात्र पोलिसांनी तातडीने दखल घेत भरपावसात हजेरी लावून जामखेडकडून येणारी आणि नगरकडे जाणारी संपूर्ण वाहतूक पर्याय मार्गाने वळविण्यात आली. त्यामुळे भरपावसात पोलिसांबरोबरच वाहनचालकांची मोठी तारांबळ उडाली.

आष्टी तालुक्यातील नगर-बीड मार्गावरील शेरी (बुद्रुक) येथे नवीन पुलाचे काम अत्यंत संथ गतीने चालू आहे. त्यातच मागील आठवड्यापासून वादळी वाऱ्यासह चालू झालेल्या पावसामुळे या ठिकाणचा तात्पुरता वाहतुकीसाठी बनविण्यात आलेला पूल अखेर शनिवारी दुपारी » पान २ वर

# आम्ही वैष्णवीला न्याय मिळवून देऊ

ऋणानुबंध:पंकजा मुंडेंकडून कसपटे परिवाराचे सांत्वन

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:वैष्णवी हगवणे वर मोठा अन्याय झाला आहे, ज्यांनी कुणी तिच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे त्यांना कडक शिक्षा होईल असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितलं. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पुण्यात वैष्णवीच्या माहेरी जावून तिचे वडिल अनिल कसपटे व कुटुंबियांची भेट घेतली ,त्यांचे सांत्वन केले तसेच त्यांना धीर दिला, त्यानंतर माध्यमांशी प्रतिक्रिया देताना त्या बोलत होत्या.

यासंदर्भात बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, वैष्णवीच्या परिवाराला आज भेटले, त्यांचं म्हणण ऐकून घेतलं, त्यांच्या म्हणण्यानुसार वैष्णवी वर ज्या प्रकारे अन्याय झाला आणि तिचे प्राण गेले ते ऐकून महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणूस देखील सुन्न झाला. प्रत्येक आई वडील आपल्या मुलीला लाडाने » पान २ वर



# ऐन उन्हाळ्यात पावसाळा नियोजित कामे खोळाबली

निसर्ग:सततच्या पावसामुळे सर्वत्र उडाली दणादण

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:अवकाळी पावसाच्या दररोजच्या हजेरीने ऐन उन्हाळ्यात पावसाळा सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांची नियोजित कामे आता विस्कटली असून, या पावसाचा लग्नसराईवर देखील परिणाम झाला आहे.

आष्टी तालुक्यात मागील आठवड्यापासून वादळी वाऱ्यासह पावसाला दमदार सुरुवात झाली. एरवी मे महिन्यात अवकाळी पाऊस कधी तरी येऊन जायचा. आता मागील आठवड्यापासून मात्र दररोज दुपारी पावसाची हजेरी नियमित ठरलेली आहे. या अवकाळी पावसाने ऐन उन्हाळ्यात पावसाळ्याचे चित्र निर्माण झाले आहे. एरवी मे महिन्यात उन्हाच्या झळांनी वातावरण उष्ण केलेले असते. या वेळेला मात्र पावसाने सगळे चित्र बदलून टाकले आहे. दररोजच्या पावसाने उन्हाळ्यात वाळलेले गवत पुन्हा हिरवे दिसू लागले आहे. जूनच्या मध्यापासून सुरू होणारा पाऊस एक महिना आधीच सुरू झाल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांची नियोजित कामे मात्र विस्कटून गेली आहेत. याचा सर्वात मोठा » पान २ वर



### पावसाचा लग्नसराईला फटका


मागील आठवड्यापासून उन्हाळ्यात सुरू झालेला पावसाळा त्रासदायक ठरत असून, या पावसाचा लग्नसराईला फटका बसला आहे. लग्नाला हजेरी लावणाऱ्या पाहुणे मंडळींची मात्र पावसाने चांगलीच तारांबळ उडाली असून, आकर्षक रोषणाईच्या झगमगटात शाही थाटात लॉन मध्ये ठेवण्यात आलेले लग्न, पावसाच्या भीतीने मंगल कार्यालयातच लावण्याची वेळ आली आहे.

खळबळ | पोलिसांनी तपास केल्यास खरे कारण समोर येईल

# त्या मुलांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:विहिरीत बुडून मृत्यू झालेल्या त्या दोन तरूणांचा मृतदेह बाहेर काढण्यात पोलीसांना अखेर यश आले. संदीप रामलाल सोनवणे, आव दीपक मोरे अशी मयत झालेल्या युवकांची नावे आहेत. शुक्रवार ता. २३ रोजी दु. १ वाजता ते दोघे विहिरीत उतरले होते. मात्र, त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. २२ तासाच्या प्रयत्नानंतर, शनिवार ता. २४ रोजी सकाळी दहा वाजता दोन पोलीस कर्मचारी व एक सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने त्या दोघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले. सदरील विहिर ८४ फूट खोल आहे. त्यामुळे, अडचणी येत होत्या.



चकलांबा ठाण्याचे पोलीस अधिकारी पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने मोहीम राबविण्यात आली होती. दरम्यान आपआपसात पोलिसांच्या मध्यस्थीने मिटवा मिटवा झाल्यामुळे, या प्रकरणात पोलीस कोणता गुन्हा दाखल करतात, या कडे लक्ष लागले » पान २ वर

मृत्यू जरी अपघाती झाला असला तरी घरच्यांची कोणाची तक्रार नसल्याकारणाने व पीएम करू नका अशी मयतांच्या घरच्यांची मागणी असल्याकारणाने संबंधित मयतांचे पीएम करण्यात आले नाही. सदर घटनेमध्ये घातपात झाला नसल्याने पोलीस काही करू शकले नाही. घटनेमध्ये घातपात जर झाला असता तर पोलिसांनी पीएम केले असते. सदर मयतांना गाडी काढण्यासाठी पाच-पाच हजार रुपये देण्यात आले होते असे घरच्यांचे म्हणणे आहे. मयतांच्या घरच्यांच्या म्हणण्यानुसार पीएम केले नसून त्यामुळे फॉरेन्सिक लॅबलाही बोलावले नाही व पीएम न करण्याबाबत मयतांच्या घरच्यांचा मागणीचा जबाब नोंदवला आहे.

-संदीप पाटील,सहाय्यक पोलीस निरीक्षक चकलांबा पोलीस ठाणे

# पुण्यभूमीच्या बातमीचा दणका

कारवाई:सुनिल नागरगोजेवर अदखलपात्र गुन्हा

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज अंबाजोगाई मतदार संघातील सुनिल नागरगोजे यांनी जरांगे पाटीलचे नाव घेऊन तुम्ही जातीवाद करीत आहात असे सचीन जोगदंड यांना म्हणाले या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की जरांगेचा माणूस म्हणून वावरतो स्वातःला शहाणा समजतोस का असे सुनील नागरगोजे सचीन जोगदंड यांच्या वर टाकुन जरागे दादा पाटील यांना जातीवादी ठरवण्याचा पूर्णपणे जाणून बुझून प्रयत्न केलेला आहे.त्यांच्या ड्राईव्हरला व्हीडीओ काढायला लावला आणि तो विडीओ फेसबुक वर वायरल केला त्या व्हिडीओ मध्ये असंवेदनशील वक्तव्य श्री. नागरगोजे यांचे वक्तव्य कैद झालेले आहे. व्हीडीओ गेल्या दोन दिवसापासून फिरत असल्याने माझ्या मनाला तीव्र वेतना झाल्या माझे मनोज दादा


...अन्यथा करणार आत्मदहन

सचीन जोगदंड :प्रशासन सुनिल नागरगोजेवर कार्यवाही कधी?

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज अंबाजोगाई मतदार संघातील सुनिल नागरगोजे यांनी जरांगे पाटीलचे नाव घेऊन तुम्ही जातीवाद करीत आहात असे सचीन जोगदंड यांना म्हणाले या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की जरांगेचा माणूस म्हणून वावरतो स्वातःला शहाणा समजतोस

१८ पक्कड जाती जमातीला घेऊन आंदोलन करतात त्याना जातीवादी ठरवण्याचा संकल्प नागरगोजे यांनी केला असा त्या व्हीडीओ मध्ये दिसून येते त्या सर्व प्रकार पाहून माझे मन चलबिचल होऊन जीव द्यावा असे वाटत असल्याने जीवन यात्रा संपवण्यासाठी आत्मदहन करणार. यापूर्वी अंबाजोगाई शहर पो.स्टे.ला पोलिस म्हणून » पान २ वर

## हिंदीचे हत्यारीकरण!

अमुक धर्माचे लोकच देशभक्त असतात असे काही नसते, तसेच अमुक एक भाषा वापरली म्हणून कुणी सच्चा देशवासी ठरत नसते. ही समज आजवर शाबूत असल्यानेच आपल्या देशात धर्म, भाषा, खाद्यासंस्कृती यांची विविधता बघायला मिळते. या वैविध्याचा आदर करायचा आणि तरीही आपापल्या अस्मिता टिकवायच्या हे कठीण असले तरी ते करावे लागते. किंवा ते अंगी असावे लागते. नाहीतर मग भाषेचा आणि भाषकांचा कैवार आम्हीच घेतो म्हणत राजकारण सुरू राहाते. हे राजकारणही बोथट आणि संधिसाधूच असले तर काय होते याचा अनुभव महाराष्ट्राला आहे. महाराष्ट्रात आपण आजही मराठी बोलू शकतो हे भाग्यच, असेही अनेकांना आजकाल वाटते म्हणतात. वास्तविक आपल्या देशाला एकच एक अशी कोणतीही 'राष्ट्रभाषा' नाही. तरीही आपल्याला आपलीच भाषा वापरणे नित्याचे न वाटता भाग्याचे वाटणे हा काळाचा महिमा म्हणावा काय? जगाची भाषा मुख्यत्वे इंग्रजी आणि माहिती तंत्रज्ञान, सेवा अशा रोजगाराभिमुख क्षेत्रातील व्यवहार इंग्रजीत होत असल्याने इंग्रजीला साहजिकच झुकते माप मिळत गेले. रोजगाराची आणि व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजीचा वापर वाढत गेला. देशभर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील पटसंख्या वाढली. पालकांचाही ओढा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडेच अधिक. साहजिकच इंग्रजीचे महत्त्व वाढत गेले. हे सारे जरी खरे असले तर मग दक्षिणेकडील राज्यांचे काय? त्यांच्यासाठी त्या–त्या राज्याची भाषा व्यवहारातही वापरणे, त्यासाठी आग्रह धरणे, हे सारे नित्याचेच कसे? बेंगळूरुमधील एका ताज्या प्रसंगाने हा व्यवहारभाषेचा आग्रह कसा तीव्र असतो हे दाखवून दिल्यामुळे हे जुनेच प्रश्न ताजे झाले आहेत. त्यामुळे आधी त्या प्रसंगाबद्दल.

बेंगळूरु शहराबाहेरील सूर्यनगर येथील स्टेट बँकेच्या शाखेत महिला व्यवस्थापकाने कानडीत बोलावे, असा आग्रह एका खातेदाराने धरला. खातेदाराचे काहीच चूक नाही. त्यावर संबंधित महिला व्यवस्थापकाचा पारा चढला. 'मी कानडीत बोलणार नाही. हा भारत देश आहे. हिंदीतच बोलणार' असा प्रति–आग्रह व्यवस्थापकाने घेतला. विषय तेथेच संपला. स्मार्ट फोनच्या जमान्यात काहीच खासगी राहात नाही. कोणीतरी त्या वादाचे चित्रीकरण केले. थोड्याच वेळात समाज माध्यमांतून हे ध्वनिचित्रमुद्रण प्रसारित झाले. मी कन्नडमध्ये बोलणार नाही – तेही कर्नाटकची राजधानी बेंगरूळुत– यावर अनेक कन्नडिगा चिडलेच; पण 'आपण इंडियात आहोत म्हणून मी हिंदीत बोलणार' यामुळे कन्नडवादाचा अतिरेक न करणारेही बिथरले. कन्नड भाषक संघटना आक्रमक झाल्या. दशकभरापूर्वी 'बेळगाव'चे 'बेळगावी' असे फेरनामकरण करणारे सिद्धरामय्याच आताही कर्नाटकचे मुख्यमंत्री असल्याने त्यांनीही संतापाचे जाहीर प्रदर्शन केले. कन्नडचा अपमान निषेधार्ह आहे, अशी ठाम भूमिका घेतली. बेंगळूरुमधील भाजपचे तरुण खासदार तेजस्वी सूर्य यांनी कानडी विरोध सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेतली. भाजपचा खासदारच 'फक्त हिंदीच बोलणार' असे म्हणणाऱ्या शाखा व्यवस्थापकाच्या विरोधात उभा राहिला. पुढील वेळी पुन्हा निवडून यायचे असल्यास कानडीच्या विरोधात भूमिका घेतल्यास काही खरे नाही, हे तेजस्वी सूर्य यांच्यासारख्या चाणाक्ष खासदाराने हेरले असावे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीच ठणकावल्यावर आणि सत्ताधारी पक्षाच्या खासदारानेही कान टोचल्यावर स्टेट बँकेने तात्काळ या महिला व्यवस्थापकाची इतरत्र बदली केली. राज्यांच्या विरोधाला केंद्रातील भाजप सरकार सहसा जुमानत नाही. पण कन्नड विरोध हा फारच संवेदशील विषय असल्याने स्टेट बँकेला कदाचित वरून आदेश दिला गेला असावा. कारण काहीच तासांत या महिला व्यवस्थापकाच्या बदलीचा आदेश निघाला. तोवर, या महिला व्यवस्थापकाने तोडक्या मोडक्या का होईना, कन्नडमध्येच सपशेल दिलगिरी व्यक्त केल्याची चित्रफीतही समाज माध्यमातून प्रसारित करण्यात आली.

राज्यातील बँक कर्मचाऱ्यांनी राज्याच्या भाषेचा वापर न केल्यास मुस्कटात देण्याच्या आंदोलनाची घोषणा महाराष्ट्रात होते, मग ती मागे घेतली जाते आणि मग सारेच विसरले जाते; तसे कोणतेही आक्रस्ताळेपण न करता कर्नाटकने जे करायचे ते केले. यापुढे कर्नाटकातील बँक कर्मचाऱ्यांना कन्नड येत नसल्यास त्यांनी सौजन्यानेच तसे सांगावे, 'हा इंडिया आहे' वगैरे सुनावू नये, हा संदेश गेला. स्टेट बँकेसारख्या बँकांना किमान दक्षिणेकडील राज्यांत तरी, आपण केवळ 'वरच्या' सरकारची मर्जी राखून चालणार नाही, इतपत जाणीव या बदलीने झाली असावी. हे दक्षिणेच्या राज्यांतच होते. याचे कारण भाषिक अस्मिता हा त्या राज्यांत कुणा एकदोघा पक्षांच्या राजकारणाचा विषय नसतो. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात त्रिभाषा सूत्राची सक्ती आणि हिंदीचा वापर वाढला पाहिजे, अशी भाजपची भूमिका यावरून सध्या केंद्रातील भाजप सरकार आणि तमिळनाडूतील सत्ताधारी द्रमुकमध्ये टोकाची रस्सीखेच सुरू आहे. द्रमुकच्या हिंदीविरोधी भूमिकेच्या विरोधात भाजपची केंद्रातील मंडळी एका सुरात हिंदीचे महत्त्व पटवून देत असली तरी, विधिमंडळात तमिळ भाषेसंदर्भातील मुद्दे येतात तेव्हा तेथील भाजपमित्र विरोधी पक्षही सत्ताधाऱ्यांना पाठिंबा देतात. कन्नड भाषेच्या मुद्द्यावर कर्नाटकातही काँग्रेस, भाजप हे टोकाचे विरोधक एकत्र आलेले बघायला मिळाले. भाजपच्या नेत्यांना पक्षाची भूमिका दूर ठेवावी लागली.

याउलट चित्र महाराष्ट्रातील. इयत्ता पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा आदेश फडणवीस सरकारने प्रसृत करताच त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. भाजपवगळता सर्वच राजकीय पक्षांनी हिंदी सक्तीच्या विरोधात भूमिका घेतली. अगदी महायुतीमधील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला हिंदी सक्तीचे समर्थन करणे शक्य झाले नाही. सर्वच थरांतून हिंदी सक्तीला विरोध होऊ लागला. सरकारने मग एक पाऊल मागे घेत हिंदी सक्तीचा शासकीय आदेश रद्द करून नवीन आदेश काढण्याचे जाहीर केले. शिक्षणमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत ही भूमिका मांडली. त्याला आता महिना उलटला पण हिंदी सक्तीची नव्हे हिंदीचा पर्याय असेल हा आदेश अद्यापही काढण्यात आलेला नाही. नवा आदेश अधिकृतपणे निघत नाही तोवर तांत्रिकदृष्ट्या जुनाच आदेश ग्राह्य धरला जातो हे माहीत असूनही विरोधी पक्षदेखील गप्प आहेत. कर्नाटक आणि महाराष्ट्रात हा फरक आहे.

# अस्वच्छ कारभाराची धुलाई गरजेची

## दुर्लक्ष:स्थानिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार :आजमितीला व गेल्या काही वर्षांपासून लोणार शहराची (आता शहर नव्हे तर बकाल, घाणेरडं भुक्कड गाव म्हणणं योग्य ठरेल) व्यवस्था व अवस्था पाहिली तर या शहरात नगरपालिका/नगरपरिषद नावाची संस्था हयात आहे की तिचा अंत्यविधी झालाय? असंच म्हणण्याची वेळ शहरवासीयांवर आलेली आहे।

अरे कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र आमचा ? असं एक वाक्य राजकारण्यांकडून प्रचलित झालंय. त्याचं धर्तीवर लोणारच्या भंगार पालिकेला उद्देशून आता असं म्हणायची वेळ आलीय की, एके काळी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या, आखीव रेखीव, नेटनेटके स्वच्छ शहर अशी ख्याती असलेल्या या शहराला केवळ तुमच्या निर्लज्ज, निर्वावलेल्या, भ्रष्ट, गल्लाभरू कारभारामुळे इतकी अवकळा आलीय की बाहेरगावचे पै–पाव्हणे जेव्हा लोणारात येतात ना त्यावेळी, तुम्ही असल्या घाणेरड्या, भंगार गावात रहातात कसे? असं विचारून काढता पाय घेतात.

जगप्रसिद्ध लोणार शहर हागणदारी मुक्त व्हावे व येणाऱ्या पर्यटकाची गैसोय होऊ नये करिता नगर पालिका प्रशासनाने वेग वेगळया चार ठिकाणी सार्वजनिक शौचालय ची व्यवस्था केली आहे परंतु या शौचालय मध्ये पाणीच उपलब्ध नसल्याचे चित्र असून सदरील शौचालय मधील नळाची तोटी पण गायब असल्याचे पहावयास मिळते तर शौचालय मध्ये प्रचंड घाण विष्ठा असून दुर्गंधी येत आहे तर या शौचालय वर भटक्या कुत्र्यांनी पाऊसापासून व उन्हापासून वाचण्यासाठी अतिक्रमण केल्याचे चित्र आहे



गेल्या काही वर्षांमध्ये तर पालिकेच्या राजकारणात असा ट्रेंड निर्माण झालाय की, निवडून येण्यापुरते गट आणि परस्पर विरोध ! पण एकदा निवडून आले की सगळ्यांची मिलीभगत... मिल बांटके खावो ! त्यामुळे तर शहराची वासलात लागणं सुरू आहे. प्रशासक नियुक्तीपूर्वी गेल्या काही वर्षांत राज्य व केंद्र सरकारच्या स्वच्छ शहर, सुंदर शहर या स्पर्धेत भाग घेतला पण आजमितीला लोणार शहराची सर्वार्थाने झालेल्या दयनीय अवस्थेस प्रामुख्याने पालिका प्रशासन व अन्य संबंधित अधिकाऱ्यांची कर्तव्यशून्यता, बेपर्वही याच बाबी कारणीभूत आहेत. कारण लोकनियुक्त प्रतिनिधी हे अस्थायी असतात आणि प्रशासन हे स्थायी असते आणि अंमलबजावणी, कारवाई करण्याचं, सेवा देण्याचं कर्तव्य हे प्रशासनयंत्रणा म्हणजेच नोकरशाहीचं असतं. पण आपल्या देशात लोकशाहीच्या नावाखाली खऱ्या अर्थाने नोकरशाहीच मुजोर झालीय... त्याला लोणार पालिका अपवाद कशी असणार ? त्यामुळं आज लोणार शहराला प्राप्त झालेल्या बकालपणाला फक्त नी फक्त पालिकेचे निष्क्रिय, भ्रष्ट प्रशासनच जबाबदार आहे हे निश्चित !

नगरपालिका प्रशासनच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी कडून सार्वजनिक शौचालय ची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाच अर्धवट माहिती असल्याचे दिसून आले , त्यांच्या कडून योग्य ती माहिती मिळू शकली नाही व मी मुख्याधिकारी तथा प्रशासका सोबत बोलून आपल्याला सविस्तर माहिती सांगतो असे आरोग्य अधिकारी कडून सांगण्यात आले

### मान्सून पूर्व नाले सफाई करा

शहरातील सार्वजनिक शौचालय वर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या तसेच मान्सूनपूर्व शहरातिल नाले सफाई करने आवश्यक असुन अवकाली पाउसात नाल्यातिल पानी व कचरा रोड वर आला असुन नगरपालिका प्रशासनाचे यामुळे पित्तल उघड़ पडले आहे तरी सुधा आजपर्यंत शहरातिल नाले सफाई न होता पूर्ण कचऱ्या नी नाल्या भरलेल्या आहेत तसेच शहरातील नाल्याची मान्सूनपूर्व साफसफाई करण्यात यावी न केल्यास शहर भाजपा कडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल –शुभम बनमेरू भाजपा शहर अध्यक्ष, लोणार

# लोणारमध्ये वाहतुक व्यवस्था ठप्प

## बोंबला:वाहतूक पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:शहराच्या मध्यवर्ती असलेल्या बसस्थानक चौकात वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. पोलिस प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना दररोज प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. वाहतुकीचे कोणतेही नियोजन नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.मंगलवारी दुपारी शहराच्या मुख्य चौकात वाहनांची प्रचंड कोंडी झाली. मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू ट्रक या रस्त्यावर एकाचवेळी अडकल्याने रस्त्यावर अक्षरशः चक्काजामची परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे या अत्यंत गोंधळाच्यावेळी चौकात एकही वाहतूक नियंत्रण पोलिस उपस्थित नव्हता. त्यामुळे वाहनचालक गोंधळून गेले. या चौकातून सुरक्षित आणि वेळेत पार पडणे आता शक्यच राहिलेले नाही

पोलिस प्रशासनावर निष्क्रियतेचा ठपका नागरिकांनी ठेवला आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याचे स्पष्ट होत आहे. केवळ अधूनमधून दंड वसूल करून जबाबदारी संपवली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला.वाहतूक नियमनासाठी योग्य पथके नेमावीत, अशी मागणी भाजपा शहर अध्यक्ष शुभम बनमेरु यांनी केली आहे. शहरातील वाहतूक सुरळीत झाली पाहिजे, यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे, अन्यथा ही वाहतूक समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

पान एक वरून

**रिपाइंच्या वतीने मंत्री संजय शिरसाट यांचा**

मझरखान, अनिल जगताप, सचिन मुळूक, बाजीराव चव्हाण, चंद्रकांत नवले, अशोक साळवे, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दीपक कांबळे, सचिन कागदे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, लक्ष्मण सिरसट, अरुण निकाळजे, दशरथ सोनवणे, दिपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, शाहू डोळस, दशरथ शिंदे, रवी जोगदंड, महेश आठवले, प्रमोद दासूद, संदिपान डोंगरे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, उत्तम मस्के, अड. सुरेश वाघमारे, भगवान ससाने, गणेश लांडगे, हरीश मस्के, मायाताई मिसळे, सलमाभाभी, संगीता जाधव, माया वाघमारे, शोभा गलांडे, राहुल सरवदे, रमेश निशिगंध, विकास मस्के, निलेश ढोबळे, बाळासाहेब ओव्हाळ, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे ,भैय्या मस्के, शाम वीर, आप्पा मिसळे,दयानंद उजगरे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे,सतीश शिनगारे, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे,भैय्या साळवे, संजय हनवते, गौतम कांबळे, सोनू वडमारे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अविनाश अवघड, नागेश शिंदे,भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, किरण खंडागळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे,रामेश्वर खळगे, सिध्दार्थ वाघमारे, देवानंद वाघमारे, विशाल पवार, दयानंद उबाळे, फुलचंद लुचारे, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.

**ऐन उन्हाळ्यात पावसाळा नियोजित**

फटका शेतीबरोबर लग्नसराईच्या हंगामाला देखील बसला आहे. संध्याकाळी शाही थाटात लॉनवर ठेवलेले लग्न या पावसामुळे पुन्हा एकदा मंगल कार्यालयात लावण्याची वेळ आली आहे. सततच्या पावसाने प्रवासावर मर्यादा आल्याने लग्नाच्या वऱ्हाडींच्या उपस्थितीवर देखील परिणाम झाला आहे.

**आम्ही वैष्णवीला न्याय मिळवून**

वाढवितात, तिच्या विवाहासाठी सर्वस्व पणाला लावतात, तिच्या सुखासाठी प्रयत्न करतात, पण अशा पध्दतीने मुलीचा प्राण गेला तर त्यांच्यासमोर मोठं प्रश्नचिन्ह उभं रहात. कसपटे कुटुंबाने तिच्या सुखासाठी सर्व केलं तरी देखील वैष्णवी चे प्राण गेले. ही घटना खरोखरच वेदना देणारी आहे. मी वैष्णवीच्या परिवाराच्या पाठिशी आहे. राज्याची एक मंत्री व महिला म्हणून मी त्यांना आश्वस्त केले आहे, त्यांच्या मनात कुठलीही शंका राहणार नाही. मुख्यमंत्री महोदयांशी पण त्यांची चर्चा झाली आहे. परिवाराच्या म्हणण्यानुसार ज्यांनी कुणी तिच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे त्यांना कडक शासन झाल्याशिवाय राहणार नाही असं ना. पंकजाताईंनी यावेळी सांगितलं.

**शेरीचा तात्पुरता पूल**

खचला. त्यामुळे या मार्गावर वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र पूल खचल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी भरपावसात हजेरी लावून जामखेडकडून येणारी आणि नगरकडे जाणारी संपूर्ण वाहतूक हा रस्ता दुरुस्त होईपर्यंत, पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. अहिल्यानगरकडे जाणारी वाहने आष्टी, बेलगाव, किन्ही,केरूळ, कडा मार्गे सोडण्यात आली तर आष्टी मार्गे जामखेड, बीडकडे जाणारी वाहने कडा, केरूळ, किन्ही, बेलगाव, आष्टीकडे वळविण्यात आल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**पुण्यभूमीच्या बातमीचा**

कार्यरत असताना खाकीचा धाक दाखवून सर्व सामान्यांना त्रास देत होता सर्व्हिस मध्ये असताना वरिष्ठांना शिवीगाळ करणे ओरावी ची भाषा वापर करणे या कारणान निलंबित करण्यात आलेले आहे कार्यवाही कधी करणार अशी बातमी दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होताच अंबाजोगाई पोलीस स्टेशन येथे सुनिल नागरगोजे यांच्या वर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**त्या मुलांचे मृतदेह बाहेर**

आहे.विहिरीत पडलेली मोटारसायकल काढण्यासाठी, विहिरीत उतरलेल्या दोन तरूणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उमापूर ता.गेवराई जि.बीड येथे शुक्रवार ता. २३ रोजी दु. एक वाजण्याचे सुमारास घडली होती. दरम्यान, विहिरीत पाणी असल्याने दोन्ही तरूणांचा मृतदेह बाहेर काढण्यात अडचणी आल्या. विहिरीतील पाणी उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. दि. २३ मे. च्या उशिरापर्यंत पाणी उपसण्यात आले. मात्र, रात्र झाल्याने मोहीम थांबविण्यात आली. शनिवार ता. २४ रोजी पोलिस पून्हा घटनास्थळी हजर झाले. क्रेनच्या सहाय्याने लोखंडी पलंगावरून दोघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्या साठी २२ तास लागले. बुडालेले दोघेजण राहता ता. शिर्डी जि. अहिल्यानगर नगर येथील आहेत. मृतदेह बाहेर काढण्यात आल्यानंतर, घटनास्थळी आलेल्या नातेवाईकांनी हंबरडा फोडला. गेवराई तालुक्यातील उमापूर जवळच्या मालेगाव रस्त्यावर हवाले यांच्या मालकीची विहिर आहे. या विहिरीत एक मोटारसायकल पडलेली आहे. सदरील मोटारसायकल काढण्याचे काम दोन तरूण करत होते. मात्र, विहिरीतल्या पाण्यात पेट्रोल पसरल्याने, तरूणांचा श्वास कोंडल्याने दोघेही पाण्यात बुडाल्याने, त्या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. विशेष म्हणजे, विहिरीच्या अवतीभवती होते. तरीही, त्यांना काहीच करता आले नाही. विहिरीची खोली अधिक असल्याने, तिथपर्यंत मदत करता आली नाही.घटनेची माहीती मिळताच, चकलांबा, उमापूर येथील पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. पंपाचा वापर करून, विहिरीतील पाणी काढण्यात आले. ती मोटारसायकल विहिरीत कशी पडली, कुणी टाकली, त्याची नेमकी कारणे पोलीस तपासात उघड होतील, अशी माहिती आहे. शनिवार ता. २४ रोजी दोन तरूणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. उमापूर ता.गेवराई येथील सरकारी दवाखान्यात शवविच्छेदन करण्यात येणार आहे. पोलीस तपास सुरू असून ,उशिरापर्यंत पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

**मोटरसायकलच्या रहस्यमय कहाण्या**

विहिरीमध्ये पडलेली मोटरसायकल नेमकी कुणाची, सदर मोटरसायकल विहिरीमध्ये पडली कशी, विहिरीमध्ये पडलेली मोटरसायकल ऊमापुरला आली कशाला, मोटरसायकल वरील चालक कोणत्या हेतूने उमापूर मध्ये दाखल, दहा हजार रुपये देऊन गुपचूप मोटरसायकल काढायला का लावली असे अनेक प्रश्न सध्या उमापूर मध्ये उपस्थित केले जात आहे याची चुणूक पोलिसांना आहे मात्र पोलिसांच्या मध्यस्थीने मॅटर सॉल झाले अशीही चर्चा उमापूर मध्ये आहे.

पान सहा वरून

**शिवसेना तिरंगा रॅलीला**

माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी–माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यकर्तृत्वाची यथोचित**

संपादक दीपक काळकुटे,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,डिजिटल मिडिया जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे,पत्रकार विष्णू राठोड,सरपंच भास्कर हातागळे,व्यवस्थापक प्रवीण वढमारे,बीड जिल्हाध्यक्ष विनायक जाधव ,बीड शहर जिल्हाध्यक्ष अमजद खान, महिला जिल्हाध्यक्षा शेख आयशा, मोरे अनुप्रिता, सतिष मुझमुले, शेख वशिम, शंकर झाडे,शेख एजाज,सोमेश्वर सोनटक्के, एस. एम. पुसरेकर, चंद्रकांत पाटील, अंकुश गवळी,यांच्या सह पत्रकार बांधव उपस्थित होते.

**बीडच्या युवासैनिकांना स्कॉर्पिओ**

युवा नेते सुरज चुंगडे, मा. युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

**जागतिक परिचारिका**

प्राविण्य घेत अनुक्रमे प्रथम क्रमांक निकिता राठोड द्वितीय क्रमांक आकांक्षा भालेराव तृतीय क्रमांक आरती नागरगोजे या विद्यार्थ्यांना विशेष सन्मान करण्यात आला या कार्यक्रमासाठी गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंतराजे भोसले प्राचार्य निर्मला मॅडम फार्मसी प्राचार्य अमित बिंदू सर उपप्राचार्या पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**विजेचा लपंडाव बंद**

नोंद घ्यावी असा इशाराच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महावितरण कंपनीच्या अभियंताला देण्यात आला याप्रसंगी शिवसेनाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, विभाग प्रमुख गोपाल मापारी, अल्पसंख्यांचे अशपाक खान, विभाग प्रमुख ज्ञानेश्वर दूधमोगरे, तानाजी अंभोरे, दिव्यांग सेलचे सिद्धार्थ अंभोरे, युवा सेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर ज्ञानेश्वर जाधव वैभव जाधव तानाजी मापारी कैलास अंभोरे महिला आघाडीच्या जिल्हा उपप्रमुख संजीवनी वाघ, तालुकाप्रमुख तारामती जायभाये यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**माजी सभापतींच्या निवासस्थानी**

बालासाहेब जाधव यांच्या निवासस्थानी भेट दिली आसता १९९५ पासुनच्या अनेक जुन्या गोष्टीचा उल्लेख करत विविध प्रश्नावर २ तास चर्चा केली त्यावेळी केज मधील विविध स्तरातील लोक उपस्थित होते नंतर त्यांनी आष्टी कडे प्रयाण केले ते लवकरच केज मधे एका मोठ्या कार्यक्रमाला उपस्थित रहाणार आसल्याचे सांगितले आहे.

**साबला येथील शेतशिवर झाला**

या कामासाठी सरपंच सौ . जनाबाई नरहरी काकडे यांनीही स्वतः जातीने हजर राहुन लक्ष दिले आहे . काम चांगल्या प्रकारे झाले तर साबला नगरितील सर्व नागरिकांना याचा भविष्यात फायदा होईल याची काळजी त्यांनी स्वतः घेतली आहे . साबला ग्रामपंचायत चे सरपंच , उपसरपंच , सर्व सदस्य . तसेच सर्व गावकरी यांनी . या एआरटी संस्था , यवतमाळ . या संस्थेने केलेल्या कामाबद्दल या संस्थेचे खुप , खुप आभार मानले . आणि राहिलेल्या कामाबद्दल काम करण्यासाठी विनंती केली .

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मोहम्मद युनूस हतबल, बांगलादेशात अस्थिरता

शेजाऱ्याचे जळके घर नेहमी आपल्यासाठी धोक्याची घंटा असते. त्या आगीच्या झळा सातत्याने आपणास बसून आपलीही त्यामुळे न भरून येणारी हानी होत असते. शेजारी चांगला असेल तर निर्धास्तपणे वावरू शकतो; परंतु शेजारी कुरापती करणारा, विध्वंस करणारा असेल तर आपणाला कधीही सुखाने झोप घेता येत नाही. याचा प्रत्यय भारताला १९४७ पासून सातत्याने येत आहे. भारताला चांगला शेजार न लाभल्याची या ७८ वर्षांमध्ये फार मोठी किंमत मोजावी लागली आहे व आजही मोजत आहे. पाकिस्तानचे आणि आपले संबंध लपून राहिलेले नाहीत. १९४७, १९६५, १९७१च्या युद्धात भारताकडून पराभूत होऊनही भारतद्वेषाची पाकिस्तानची खुमखुमी आजही कायम आहे. उघडपणे विजय मिळणे शक्य नसल्याने कधी पुलवामा, कधी २६/११ची घटना, काल-परवा घडलेली पहलगामची घटना हे पाकिस्तान पुरस्कृती दहशतवादी प्रकार असल्याचे सर्वांनाच माहिती आहेत. भारताच्या सहकार्याने व प्रयत्नाने ज्या बांगलादेशाची निर्मिती झाली आहे, तोच बांगलादेश चीनच्या सहकार्यामुळे आपल्यावर डोळे वटारण्याचे धाडस दाखवत आहे. चीनसारखा बलाढ्य शेजारी अरुणाचल प्रदेश व अन्य भागांतून आपल्या देशातील भागावर अतिक्रमण करण्याचे धाडस दाखवत आहेत पाकिस्तानच्या स्थापनेपासून. तेथील पंतप्रधानांची अखेर लष्करांच्या मर्जीनुरूपच झालेली आहे. बांगलादेशातही सध्या हेच चित्र सुरू आहे. बांगलादेशातील घडामोडींवर लष्कराचा प्रभाव वाढत चालला असून लष्कर नियंत्रणातच यापुढे बांगलादेशची वाटचाल होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणुकांच्या विषयावरून बांगलादेशमधील राजकारण सध्या तापण्यास सुरुवात झालेली आहे. काही दिवसांपासून युनूसच्या सरकारला अनेक गंभीर आव्हानांचा सामना करावा लागला आहे. देशाच्या लष्करासोबत त्यांना सामना करावा लागला आहे. बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी अखेर अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांना लवकर निवडणुका घ्याव्यात, लष्करी बाबींमध्ये हस्तक्षेप करणे थांबवावे आणि प्रस्तावित राखीन कॉरिडॉरसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लष्कराला माहिती द्यावी असा कडक संदेश दिला आहे. अंतरिम सरकारला या वर्षी डिसेंबरपर्यंत राष्ट्रीय निवडणुका घ्याव्या लागतील, अशी घोषणा बुधवारी ढाक्याच्या सेनाप्रांगन येथे जनरल वॉकर यांनी केली. बांगलादेशमध्ये गेल्या दोन दिवसांपासून अंतरिम सरकार आणि लष्कर यांच्यातील संघर्ष समोर आला आहे. लष्करी मुख्यालयात आपल्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-झमा यांनी स्पष्टपणे सांगितले की, या वर्षी डिसेंबरच्या पुढे सार्वत्रिक निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत. लष्करप्रमुखांनी इशारा दिला की युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारला संवेदनशील राष्ट्रीय मुद्द्यांवर निर्णय घेण्याचा कोणताही संवैधानिक अधिकार नाही. राखीन कॉरिडॉरच्या मुद्द्यावर, मार्चपासून लष्कर म्हणत आहे की आमच्या संमतीशिवाय ते बांधणे बेकायदेशीर आहे.

बांगलादेशातील म्यानमार सीमेवरील राखीन जिल्ह्यात मानवतावादी कॉरिडॉर बांधण्याच्या कथित योजनेवरून लष्कर आणि सरकार आमने-सामने आहेत. बांगलादेशचे परराष्ट्र सल्लागार तौहीद हुसेन यांनी जाहीर केले होते की, अंतरिम सरकारने अमेरिकेने प्रस्तावित केलेल्या राखीन कॉरिडॉरला सहमती दर्शविली आहे. लष्करप्रमुख वकार यांनी बुधवारी याला रक्तरंजित कॉरिडॉर म्हटले आणि अंतरिम सरकारला इशारा देत म्हटले की, बांगलादेश सैन्य कधीही सार्वभौमत्वाला हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही कृतीत सहभागी होणार नाही. तसेच कोणालाही तसे करण्याची परवानगी दिली जाणार नाही. यानंतर युनूस सरकारने यू-टर्न घेतला आणि सांगितले की, त्यांनी म्यानमार सीमेवरील राखीन कॉरिडॉरबाबत कोणत्याही देशाशी कोणताही करार केलेला नाही. ५ ऑगस्ट २०२४ रोजी शेख हसीना देश सोडून भारतात आल्या. प्रत्यक्षात देशभरात त्यांच्याविरोधात विद्यार्थी निदर्शने करत होते. ५ जून रोजी बांगलादेशातील उच्च न्यायालयाने नोकऱ्यांमध्ये ३० टक्के कोटा प्रणाली लागू केली, ढाका येथील विद्यापीठातील विद्यार्थी या आरक्षणाविरुद्ध निदर्शने करत होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना हे आरक्षण दिले जात होते. तथापि, हसीना सरकारने नंतर हे आरक्षण रद्द केले; परंतु त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत निदर्शने सुरू केली. हसीना आणि त्यांच्या सरकारविरुद्ध मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि सामान्य लोक रस्त्यावर उतरले. या निषेधाच्या दोन महिन्यांनंतर, ५ ऑगस्ट रोजी त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर अंतरिम सरकार स्थापन झाले. यानंतर शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. शेख हसीना यांच्यानंतर बांगलादेशात मोहम्मद युनूस यांचे सरकार सत्तेवर आले खरे, पण हे सरकार चीन आणि पाकिस्तानच चालवत असल्याचे अल्पावधीतच स्पष्ट झाले. बांगलादेशची अर्थव्यवस्था चीनच्या विळख्यात सापडत आहे. एकेकाळी भारताचा मित्र असलेला बांगलादेश आता चीनच्या जवळ गेला आहे. मोहम्मद युनूस सरकार चीनची स्तुती करताना थकत नाही. पण, दुसरीकडे बांगलादेश चीनच्या कर्जाच्या विळख्यात अडकत चालला आहे. गेल्या काही वर्षांपासून बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेवर चीनची पकड मजबूत होत आहे. भारत अजूनही बांगलादेशचा भागीदार आहे. पण, आकडेवारीनुसार बांगलादेशची चीनवरची व्यापारी निर्भरता धोक्याची पातळी ओलांडत आहे. भारताने बांगलादेशला नेहमीच सहकार्य केले आहे. मात्र युनूस सरकारच्या सत्तास्थापनेनंतर बांगलादेशची भूमिका बदलली आहे. अगोदरच्या काळात भारत हा बांगलादेशचा अत्यंत जवळचा मित्र होता. गेल्यावर्षी बांगलादेशात अराजकता निर्माण झाली आणि शेख हसीनांच्या सरकारचा पाडाव झाला. आज बांगलादेशाची जीडीपीही घसरली आहे. धार्मिक तणावही मोठ्या प्रमाणात निर्माण झाले होते. बांगलादेशच्या काळजीवाहू सरकारचे प्रमुख प्रोफेसर मोहम्मद युनूस यांनी आता राजीनाम्याची तयारी दाखवली आहे. सध्याच्या राजकीय संकटामुळे आणि पक्षांमध्ये एकमत नसल्यामुळे ते राजीनामा देण्याचा विचार करत आहेत. देशात सुरू असलेल्या राजकीय गतिरोधामुळे आणि पक्षांमधील संवादाच्या अभावामुळे त्यांचे सरकार प्रभावीपणे काम करू शकत नाही याबाबत युनूस यांनी चिंता व्यक्त केली. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)नेही युनूसवर दबाव वाढवला आहे आणि डिसेंबरमध्ये निवडणुका घेण्याची मागणी पुन्हा केली आहे. बांगलादेशातील घडामोडींवर भारताला नजर ठेवावीच लागणार आहे. भारताला त्रास देण्यासाठी अथवा दबावाखाली ठेवण्यासाठी चीन आगामी काळातही बांगलादेशचा ढाल म्हणून वापर करतच राहणार आहे.

# विराट - रोहितची निवृत्ती, पुढे कसोटी!

**शंतनू चिंचाळकर**



विराटच्या निवृत्तीमुळे भारताने एक गुणी, तडाखेबाज, आक्रमक पण वेळप्रसंगी तितक्याच संयमाने निर्णय घेणाऱ्या क्रिकेटपटूला कसोटी क्रिकेटमधून निरोप दिला. रोहितपाठोपाठ त्याने घेतलेला निर्णय धक्कादायक असला तरी रोज नवनवीन उत्तमोत्तम युवा खेळाडू पुढे येत असताना वेळीच निवृत्ती जाहीर करून नव्या रक्ताला वाव देणे विराटने कधीही देशहिताचे मानले असेल. त्याच्या झगमगत्या कारकिर्दीचा वेध...

एकीकडे भारत - पाकिस्तानमध्ये निर्माण होत असलेल्या वाढत्या तणावाचे धक्के सहन करत असतानाच, क्रिकेटच्या विश्वामध्ये हिटमॅन म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या भारताच्या महान फलंदाजाने, रोहित शर्माने २० ओव्हर्सच्या मर्यादित षटकांच्या सामन्यांपाठोपाठ कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्ती जाहीर करून क्रिकेटरसिकांना धक्का दिला. या घटनेला आठवडाही होत नाही तोवर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येणारा दुसरा धडाकेबाज फलंदाज, महान खेळाडू विराट कोहली यानेही कसोटी क्रिकेटला जय महाराष्ट्र केला. त्यानेही यापूर्वीच आंतरराष्ट्रीय टी-२० संघातून निवृत्ती जाहीर केली आहे. हे दोघेही कसोटी संघातून निवृत्त होणार असले तरी वनडे क्रिकेटमध्ये मात्र खेळणार आहेत.

क्रिकेट हा भारतातील क्रीडारसिकांचा सर्वात आवडता आणि लोकप्रिय खेळ आहे. भारताला कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या कैक महान आणि गुणी खेळाडूंची परंपरा आहे. त्यातील कर्णधार आणि फलंदाज अशा दोन्ही भूमिका पार पाडणाऱ्या अजित वाडेकर, सुनील गावसकर, सौरभ गांगुली आणि अझरुद्दीन यांचा विशेष उल्लेख करता येईल. त्यांच्या वैयक्तिक आणि सांघिक खेळावर आजवर भारताने कैक कसोटीच नव्हे तर मालिका विजयही संपादन केले. पण तो काळ वेगळा होता. क्रिकेट म्हटले की शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालीयन वयाच्या आसपासचे तरुण त्यात रस बाळगून होते. पण आज दुसरी-तिसरीतल्या शालेय मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्व स्तरातून क्रिकेटची आवड निर्माण होऊ लागली आहे. म्हणूनच इतर कोणत्याही खेळाडूंच्या कसोटी क्रिकेटमधून घेतलेल्या निवृत्तीची बातमी मनाला क्लेश देऊन गेली नसेल एवढी लागोपाठ येऊन धडकलेल्या रोहित शर्मा आणि नंतर विराट कोहलीच्या निवृत्तीची बातमी चटका देऊन गेली. आज पाच दिवसांचे कसोटी क्रिकेट सामने म्हटले तरी ५० षटकांच्या एकदिवसीय किंवा ट्रेन्टी - ट्रेंटी सामन्यासारख्या धडाकेबाज आणि तितक्याच सातत्यपूर्ण खेळाची अपेक्षा चाहत्यांकडून केली जाते. खरे तर या दोन्ही महान खेळाडूंच्या खेळातील सातत्य, त्यांची शारीरिक तंदुरुस्ती, क्षेत्ररक्षणातील चपळता या गुणांचा विचार केला तर रोहितचे ३८ आणि विराटचे ३६ ही तशी निवृत्ती घ्यायची वये नव्हेत, असे क्रिकेटमधील कोणीही दर्दी जाणकार म्हणेल. देशासाठी सर्वोत्तम कामगिरी पार पाडत आहात, तिथे वय ही गोष्ट दुय्यम राहते. आणखी दोन-तीन वर्षे तरी त्यांनी कसोटी खेळणे चालू ठेवायला हवे होते, असे मत चाहतावर्ग सोशल मीडियावरून मांडत आहे. रोहितच्या कसोटी क्रिकेटमधील कारकिर्दीचा विचार केला तर २०१३ मध्ये वेस्ट इंडिज क्रिकेट संघाविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळणाऱ्या रोहितने कसोटी क्रिकेटमध्ये ११६ डावांमध्ये ४०.५७ च्या सरासरीने ४,३०१ धावा केल्या आहेत. दरम्यान, त्याने १२ शतके आणि १८ अर्धशतके झळकावली आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याचा सर्वोच्च स्कोअर २१२ धावा आहे. तर कर्णधार म्हणून रोहितने २४ कसोटी सामन्यांमध्ये ३०.५८ च्या सरासरीने १,२५४ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा भारतीय कर्णधार म्हणून शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ७२.५ टक्के विजयदरासह कर्णधारपदाच्या खुर्चीच्या सर्वोच्च स्थानावर होता.

रोहित आणि विराटच्या या निर्णयांमुळे त्यांच्या चाहत्यांना मात्र मोठा धक्का बसला. प्रत्येक खेळाडूचे आपले असे वैशिष्ट्य असते. त्यामुळे रोहितपेक्षा विशेषकरून विराट कोहलीच्या कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीची बातमी भारतीय क्रिकेटरसिकांना धक्का देऊन गेली. स्लीप आणि कव्हर पॉइंट या आवडत्या क्षेत्ररक्षणाच्या जागांवर त्याने टिपलेले अप्रतिम आणि अशक्यप्राय झेल पाहीले तर तो केवळ एक महान फलंदाजच नव्हे तर चपळ क्षेत्ररक्षकही आहे याबद्दल दुमत असायचे कारण नाही. भारताकडून १८ वर्षांखालील संघाचे केवळ सदस्यत्वच नव्हे तर, कर्णधारपद भूषवणाऱ्या विराटने २० जून २०११ रोजी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने १२३ सामन्यांमध्ये २१० डावांमध्ये ९२३० धावा केल्या आहेत. त्याने ३० शतके आणि ३१ अर्धशतके केली आहेत. तो १४ वेळा नाबाद राहिला असून १०२७ चौकार आणि ३० षटकार मारले आहेत. नाबाद २१४ ही विराटची सर्वोच्च धावसंख्या राहिली असून त्याने सात द्विशतके झळकावली आहेत. आपल्या कारकिर्दीचा शेवट त्याने वैयक्तिक दहा हजार धावा पूर्ण झाल्यावर करायला हवा होता, असे त्याचे चाहते नक्की म्हणत असतील. पण क्रिकेटची पंढरी असलेल्या भारतात रोज नवनवीन तरुण उदयन्मुख खेळाडू पुढे येत असताना वेळीच आपली निवृत्ती जाहीर करून त्यांच्यापैकी एकाला संधी देणे विराटने देशहिताचे मानले असेल.

क्रिकेटच्या मैदानावर खेळत असताना विराटचे आपल्या खेळाद्वारे केवळ वैयक्तिक कामगिरीच नव्हे तर, आपल्या संघातील सहकाऱ्यांची कामगिरीही कशी चमकेल यावर लक्ष केंद्रित केले. फलंदाजाच्या जवळ थांबून, कॉमेंट्स करून आपल्या संघातील गोलंदाजांचे लक्ष विचलित करणाऱ्या ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसारख्या संघातील क्षेत्ररक्षकांना त्यांच्याच भाषेत उत्तरे देणारा विराट प्रेक्षकांशी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हास्यविनोद करताना दिसणारा विराट, एखादा अप्रतिम झेल घेतल्यावर दर्शक स्टँडमध्ये बसलेल्या आपल्या पत्नीला किमान टाळ्या वाजव म्हणून खाणाखुणा करणारा विराट (!) आता फक्त एकदिवसीय आणि आयपीएल सामन्यांमधूनच दिसेल.

आणखी काही दिवस कसोटी सामने खेळून विराटला काही विक्रम आपल्या नावावर करण्याची संधी होती. त्याने नेतृत्व केलेल्या कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनण्याची संधी त्याला होती. सचिन तेंडुलकरने ७२ कसोटी सामन्यांच्या ११३ डावांमध्ये ५९४६ धावा केल्या. विराटने आतापर्यंत ४७४६ धावा केल्या आहेत. सचिनचा विक्रम मोडण्यासाठी त्याला १२०१ धावांची गरज होती. त्याच्या इंग्लंड दौऱ्यावर न जाण्याने त्याचा इंग्लंडविरूद्ध सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम होणार नाही. विराट कोहलीने इंग्लंडमध्ये १७ टेस्ट सामन्यांमध्ये ३३ च्या सरासरीने १०९६ धावा केल्या आहेत. इंग्लंडमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम त्याच्या नावावर करण्याची संधी होती. सचिन तेंडुलकरने ३० डावांमध्ये ५४ च्या सरासरीने १५७५ धावा केल्या आहेत.

सर्वात महत्त्वाचा विक्रम म्हणजे क्रिकेटमध्ये विराट कोहलीच्या ९२३० धावा असून इंग्लंडवत्रुद्धची मालिका खेळली असती तर त्याला दहा हजार धावांचा टप्पा पूर्ण करण्याची संधी होती. भारताकडून सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांनाच ही कामगिरी करता आली आहे. विराट कोहली या विक्रमापासून दूर राहिला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम रोहित शर्माच्या नावावर आहे. त्याने ४० सामन्यांमध्ये २७१६ धावा केल्या आहेत. रोहितने टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. विराट कोहली ४६ सामन्यांमध्ये २६१७ धावा करून दुसऱ्या क्रमांकावर आहे. विराट या विक्रमापासूनही दूर राहिला. भारतीय संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी जून २०२५ मध्ये इंग्लंडचा दौरा करणार आहे. विश्व कसोटी चॅम्पियनशिप २०२७ साठी हा दौरा दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. अशा महत्त्वाच्या दौऱ्यात रोहित, विराटसारख्या गुणी खेळाडूंची उणीव भारतीय संघाला नक्की जाणवेल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला यश मिळाले असले तरी, बीसीसीआय त्याच्या वाढत्या वयामुळे नवीन नेतृत्व शोधत होते. त्याच्यानंतर ज्याच्यावर कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली असती तो विराटही आता संघात नसल्याने एका धडाकेबाज पण संयमी सलामीवीर फलंदाजांची उणीव भारतीय संघाला जाणवू शकते. रोहित शर्मानंतर कसोटी संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराह किंवा हार्दिक पंड्याकडे जाण्याची शक्यता आहे, पण विराटइतके नेतृत्वगुण आणि तत्पर निर्णयक्षमता या दोघांपैकी कुणाकडेही नाही. म्हणूनच जून २०२५ च्या येत्या इंग्लंड दौऱ्याच्या वेळी भारतीय संघाची खरी कसोटी लागणार आहे.

# पाणीटंचाई



**रवींद्र तांबे**



महाराष्ट्र राज्यात सध्या मान्सूनपूर्व मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यात दरवर्षी ग्रामीण भागातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. पावसाचे पाणी अडविणे किंवा जिरवणे याचा विचार करता यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो का? याचा विचार होणे आवश्यक आहे. आज ज्या पद्धतीने ग्रामीण भागात नागरिकांना पाण्यासाठी काही ठिकाणी काटकसर करावी लागत आहे. याचा विचार करता पाण्याची बचत ही आजच्या काळाची खरी गरज आहे. यासाठी शासकीय स्तरावर कडक धोरण राबविले गेले पाहिजे. अन्यथा येत्या काही वर्षांत पाणीटंचाईचा प्रश्न अधिक गंभीर होईल. पाण्याबरोबर उन्हाचे सुद्धा चटके सहन करावे लागत आहेत. तेव्हा येत्या पावसाळ्यापासून प्रत्येकांनी आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करायला हवे. पाणी अडवणे व जिरवणे ही प्रक्रिया केवळ पाणीटंचाईचे निराकरण करत नाही तर पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत करते. तेव्हा पाणी संवर्धन आणि बचत ही आजच्या काळाची गरज आहे. कारण निसर्गातील पाण्याचा स्रोत टिकवण्यासाठी हा उपाय प्रभावी ठरतो.

१ मे २०२५ रोजी आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन ६५ वर्षे पूर्ण झाली. प्रगत महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन कटिबद्ध झाले आहे. मात्र राज्यात पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. राज्यात पाणी अडवा पाणी जिरवा, पाण्याची बचत करा असे जरी सांगत असू तरी पाणीटंचाईची कारणे समजून घेणे गरजेचे आहे. असे जर मागील ६५ वर्षांत झाले असते तर आज राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईची वेळ आली नसती. याची सरकारने गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

सिनेअभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी 'नाम फाऊंडेशन' या धर्मादाय संस्थेची स्थापना केली. परंतु पाण्यासाठी सुद्धा या धर्मादाय संस्थेने राज्यात पुढाकार घेतला आहे. ही समाधानाची बाब असली तरी लाखो रुपये खर्च करून सुद्धा वस्तीत पाणी आलेले नाही याचाही विचार होणे आवश्यक आहे.

कोकणातील ग्रामीण भागात १९९४ पर्यंत पाण्याचा प्रश्न आला नव्हता. त्यावेळी काही ठिकाणी पावसाळी, हिवाळी व उन्हाळी शेती केली जात असे. व्हाळाला बांध बांधून, पाटाने पाणी आणून शेती केली जात असे. मी सुद्धा पाटाच्या पाण्यावर शेती केली आहे.

आता मात्र परिस्थिती वेगळी दिसते. पूर्वी माती व झाडाच्या फांद्याच्या साहाय्याने पाणी अडवले जात होते. आता मात्र लाखो रुपये खर्च करून सिमेंटचे बंधारे बांधले जात आहेत. मात्र ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यामध्ये धरणे कोरडी दिसतात. याला जबाबदार कोण? आपणच ना..! त्यावर योग्य प्रकारे तज्ज्ञ व्यक्तीच्या मार्फत शोध लावणे गरजेचे आहे. असेच जर चालले तर उद्या पाण्यासाठी काय करावे लागेल याचा सुद्धा विचारविनिमय करायला हवा.

अलीकडच्या काळात राज्यात उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाईची परिस्थिती का निर्माण होते. याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील पाणीटंचाईवर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणजे पाणीटंचाईवर योग्य उपाय सुचविता येतील. अजून पाण्यासाठी एक महिना महत्त्वाचा आहे. आता जरी पाऊस पडत असला तरी जून महिन्यामध्ये पाऊस पडेलच याची शाश्वती नाही. तेव्हा आतापासून पाणी जपून वापरावे लागेल. खेड्यात दोन ते तीन दिवसांनी अर्धा तास पाणी येते. त्यामुळे पुढील दिवशी पाणी येईपर्यंत पाण्याचा साठा नागरिक करून ठेवत आहेत. मात्र हे भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. त्यात रोजगारचा प्रश्न त्यामुळे खेड्यातील लोक जास्त उदासीन दिसत आहेत. कारण आरोग्यासाठी पाणी महत्त्वाचे असते. आजही ग्रामीण भागात स्वच्छ पाण्याचा अभाव दिसून येतो. तेव्हा लोक पाणी गाळून नंतर उकळून पितात.

आता आपल्याला पाणीटंचाईची अनेक कारणे सांगता येतील. परंतु पाणीटंचाईच्या प्रमुख कारणांचा अभ्यास केल्यास त्याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यातील वाढती लोकसंख्या. त्यामुळे पाण्याचा जास्त प्रमाणात वापर केला जात असून त्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा गैरप्रकार होत आहे. औद्योगिकीकरणाच्या नावाखाली झाडांची होत असलेली कत्तल आणि वाढते शहरीकरण त्यामुळे पाण्याची पातळी खालावली आहे. तसेच शेती, घरगुती वापरासाठी पाणी आणि उद्योगासाठी बऱ्याच ठिकाणी पाण्याची पातळी खाली गेलेली दिसत आहे. याचा परिणाम राज्यात बऱ्याच विहिरी उन्हाळ्यात कोरड्या पडताना दिसत आहेत. याला आधार म्हणून राज्यात पाणी अडवा, पाणी जिरवा संकल्पना राबवली जात आहे. मात्र त्याचा फारसा प्रभाव दिसून येत नाही. यात बऱ्याच प्रमाणात शासकीय अनुदान खर्च होत आहे.

नदीनाल्यात पाणी अडविले जात आहे. त्याचा फायदा स्थानिक नागरिकांना काही प्रमाणात झालेला दिसून येत असला तरी दूर वरच्या नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यात पाळीव जनावरांचे सुद्धा हाल होत आहेत. सर्व सजीव जीवांसाठी पाणी हे एक अनमोल संसाधन आहे. त्याचा योग्य प्रकारे वापर केला पाहिजे. यासाठी शासकीय पातळीवर निःपक्षपातीपणे नियंत्रण ठेवायला हवे. तसेच शासकीय अनुदानाचा योग्य वापर केला पाहिजे. तरच भविष्यात राज्यातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येणार नाही.

## राशिभविष्य

शनिवार ,२४ मे २०२५

**॥ पंचांग ॥**

आज मिती वैशाख कृष्ण द्वादशी शके १९४७, चंद्र नक्षत्र रेवती, योग आयुष्मान, चंद्र राशी मीन. भारतीय सौर ३ ज्येष्ठ शके १९४७ म्हणजेच शनिवार, दिनांक २४ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.०१, मुंबईचा सूर्यास्त ०७.०९ मुंबईचा चंद्रोदय ०४.०३ उद्याची मुंबईचा चंद्रास्त ०४.१७ राहू काळ ०९.१८ ते १०.५६ शनि प्रदोष, शुभ दिवस-सायंकाळी-०७;२१ पर्यन्त.

**॥ भविष्य ॥**

**मेष** : यशप्राप्ती मिळणार आहे.

**वृषभ** : ग्रहमानाची साथ लाभणार आहे.

**मिथुन** : नोकरीत अनुकूलता लाभेल.

**कर्क** : धनलाभाच्या दृष्टीने अनुकूल काळ आहे

**सिंह** : नवीन प्रयोग सफल होतील.

**कन्या** : कामाचे स्वरूप बदलू शकते.

**तूळ** : धनप्राप्तीचे योग आहेत.

**वृश्चिक** : धार्मिकतेमध्ये रस निर्माण होईल.

**धनू** : मनस्तापाची शक्यता.

**मकर** : आपले वर्चस्व वाढविण्याचा प्रयत्न करू नका.

**कुंभ** : नोकरीबाबतच्या समस्या मिटतील.

**मीन** : घरामध्ये एखादे कार्य घडेल.

## जनसंवाद

### सार्वजनिक सुरक्षेचे भान ठेवा!

हरियाणातील हिसार येथील (कु)प्रसिद्ध यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हिला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. तिला अटक करण्यात आल्यानंतर पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या आणखी काही लोकांची धरपकड करण्यात आली. या लोकांच्या देशद्रोही कृत्यामुळे त्यांना कायद्यानुसार कठोर शिक्षा होईलच पण सोशल मीडियाचा वापर किती घातक पद्धतीने केला जाऊ शकतो हे या घटनेने समोर आले आहे. खरे तर सध्या अधिकाधिक सोशल मीडिया 'रील्स'ने व्यापला आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. कारण सध्याचा जमाना रील्सचा आहे. सर्व ताळतंत्र सोडून रील्स बनवायचे, सोशल मीडियावर टाकायचे आणि जास्तीत जास्त लाईक्स आणि कॉमेंट्स मिळविण्यासाठी प्रयत्न करायचा, असे व्यसनच सर्व वयोगटातील सोशल मीडियाच्या 'रीलस्टार्स'ना लागले आहे. दुसरे म्हणजे ते व्लॉगर्स! ते व्हीडिओ ब्लॉगिंग म्हणजे व्हीडिओद्वारे विविध विषयांवर आपले विचार, अनुभव मांडून सोशल मीडियावर शेअर करतात. यावेळी आपण हे व्हीडिओ कुठे चित्रित करत आहोत, विषय आणि हे ठिकाण संवेदनशील आहे का? सार्वजनिक सुरक्षेला बाधा आणणारे आहे का? याचा विचारही हे व्लॉगर्स करत नाहीत. ज्योती मल्होत्राने देशद्रोही कृत्यांसाठी जाणीवपूर्वक सोशल मीडियाचा वापर केला. पण आपणही रील्स-व्लॉगच्या माध्यमातून कळत नकळत सायबर चोरांना, देशद्रोह्यांना आपली संवेदनशील माहिती पुरवत असतो याचे भान उत्साही नेटकऱ्यांनी ठेवणे गरजेचे आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### खगोलशास्त्रातील तेजस्वी ध्रुवतारा

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या काही मोजक्या वैज्ञानिकांनी देशाला महत्वपूर्ण योगदान दिले, त्यातील एक नाव म्हणजे पद्मविभूषण डॉ. जयंत विष्णू नारळीकर. डॉ. नारळीकर यांनी खगोलशास्त्रामध्ये उत्तुंग अशी प्रगती करून जगात भारत देशाचे नाव उंचावले. मराठी मातीच्या या सुपुत्राने खगोलशास्त्रात घेतलेली झेप निश्चितच देशासाठी अभिमानाची होती. खगोल शास्त्रात डॉ. नारळीकरांनी जे संशोधन केले, त्या संशोधनाचे कौतुक केवळ भारतातच नाही तर जगभरात झाले. त्यामुळे त्यांना जगभरातून मान्यता मिळाली होती. डॉ. नारळीकर हे संशोधन क्षेत्रात कार्यरत न राहता लेखनाच्या माध्यमातून विज्ञानवादाचा प्रसार केला. सखोल विज्ञानात त्यांचा पूर्वीपासूनच ओढा होता. त्यातूनच त्यांनी आकाशासी नाते जोडले. विज्ञानातील सर्व घडामोडी लहानांपासून ते आबालवृद्धापर्यंत सहज आणि सोप्या भाषेत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन जपावा आणि अंधश्रद्धा दूर व्हाव्यात यासाठी डॉ. नारळीकर ध्रुवतारा राहिले. डॉ. नारळीकरांनी भौतिक विज्ञान, खगोलशास्त्राच्या प्रचारासाठी स्थापन केलेली 'आयुका' संस्था ही देशाचे ज्ञान वैभव वाढवणारी आणि भूषण ठरली आहे. त्यांचे कार्य भारतदेशासाठी महत्त्वाचे होते. डॉ. नारळीकर हे केवळ खगोलशास्त्रज्ञ इंधन नव्हते तर विज्ञान लेखक आणि विज्ञान प्रसारकही होते. डॉ. नारळीकर आपल्या संशोधना सोबतच समाजविभुख विज्ञाननिष्ठा भूमिकांसाठी ओळखले जात. त्यांनी अंतराळ आणि विज्ञान, सूर्याचा प्रकोप अशा अनेक पुस्तकांच्या रूपाने साहित्य संपदा लिहिली. नाशिक येथे झालेल्या ९४ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. खगोल क्षेत्रात केलेले बहुमूल्य अशी कामगिरी आणि त्यासाठीचे योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने या प्रगल्भ अशा विज्ञान संशोधकाला पद्मभूषण आणि पद्मविभूषण हा सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले. तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनीही सन्मानित झालेल्या डॉ. नारळीकर यांच्या जाण्याने विज्ञान आणि साहित्य क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**- सुनील कुवरे,** शिवडी

### निसर्गाचे बदलते ऋतुचक्र मानवाला हानिकारक...

सध्या अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने अनेक जिल्ह्यातील व्यवस्था कोलमडली असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते आहे. मुंबई, पुणे, विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांना पावसाने झोडपून काढले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पाऊस बरसत असल्याचे हवामान विभागाकडून वर्तविण्यात येत आहे. काही ठिकाणी या पावसामुळे बंधारे ओसंडून वाहत आहेत तर काही प्रमुख रस्त्यांवर पाणी आले आहे. सातत्याने वातावरणामध्ये बदल होत असून अनेक मानवनिर्मित घटनांमुळे निसर्गसुद्धा आपली ऋतुचक्र बदलले आहे की काय, असा सवाल उपस्थित होत आहे. पावसाळा ऋतू प्रारंभ होण्यास अगदी काही दिवसांचा कालावधी बाकी आहे. त्या अगोदरच पावसाने झोडपून काढल्याने सर्वांची त्रेधातिरपीट उडाली आहे. पावसाळ्यापूर्वी सरकारने पुरबाधित क्षेत्राची पाहणी करून योग्य नियोजन केले पाहिजे. देशांतील अनेक भागांत नवीन रस्ते निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये नद्यांचा देखील समावेश आहे त्याचा देखील विचार करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारची घाईगडबड न करता हंगामी पाऊस सुरू झाल्याशिवाय पेरणी न केलेली बरी कारण कधीही ते हिताचे ठरणारं आहे!

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगाव

### मूल्यामागील स्त्रीपुरुष (अ)समानता !

सध्या एका हुंडाबळीची राज्यभर चर्चा आहे. हुंड्यासाठी कोणाचाही बळी जाणे हे चुकीचेच आहे. पण जेव्हा एखादा पुरुष घरगुती हिंसाचाराच्या खोट्या केसेसमुळे किंवा पोटगीच्या अवास्तव मागणीमुळे / किंवा पत्नीकडून होणाऱ्या शारीरिक / मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या करतो तेव्हा त्या बातमीला एवढे महत्त्व वृत्तवाहिन्या का देत नसाव्यात? नुकतेच पुण्यात एका हॉस्पिटलमध्ये महिलेचा मृत्यू झाल्यावर वृत्तवाहिन्यांनी सतत ती बातमी दाखवून सरकारवर केवढा दबाव आणला होता. पण त्या महिलेच्या जागी एखाद्या पुरुषाचा मृत्यू झाला असता तर ती बातमी किती दिवस मीडियामध्ये दिसली असती? आपल्याकडे मृत व्यक्ती ही स्त्री आहे की पुरूष यावर त्या बातमीचे मूल्य ठरते का ?

**- अनिकेत शेटे ,** पुणे

# येरवडा कारागृहातर्फे कैद्यांच्या नातेवाइकांसाठी प्रतीक्षालय




◆ येरवडा (वार्ताहर) :

सायबेज सॉफ्टवेअर प्रा. लि.च्या कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी योजना (सीएसआर) गटाने, सायबेज फाऊंडेशनतर्फे पुण्यातील ऐतिहासिक येरवडा मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना भेट देणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक नवीन आणि सुसज्ज प्रतीक्षालयाचे लोकार्पण केले. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने वागवले जावे तसेच विशेषतः तुरुंगवासाला सामोरे जात आहेत त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम सुविधा प्रदान करणे हा सायबेज फाऊंडेशनचा महत्त्वाचा हेतू आहे. प्रतीक्षालय समाजापासून दूर कोठडीत असलेल्या व्यक्तींप्रती असलेल्या दृष्टिकोनाला बदलण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी योग्य सुविधा पोहचवण्यासाठी राबवण्यात येत आहे. लहान मूल असलेल्या मातांपासून ते लांब प्रवास करून येणाऱ्या वृद्ध पालकांपर्यंत, सर्व कुटुंबीयांना सुरक्षित आणि स्वच्छ, सन्मानजनक सुविधा प्रदान करण्यात येईल. ज्यामुळे त्यांना भावनिक आणि शारीरिक संघर्षाला तोंड देणे सुकर होईल. रितू नथानी, संचालक मंडळ सदस्य, सायबेज फाउंडेशन प्रमुख, सायबेज सॉफ्टवेअर प्रा. लि.यांनी सांगितले, "प्रतीक्षालय केवळ विटा आणि सिमेंटचा ढाचा नाही, तर ती सद्भावना आणि सहवेदना यातून उभारलेली जागा आहे. अनेकदा खेड्यापाड्यांतून आलेली कुटुंबे आपल्या जवळच्या व्यक्तीला भेटण्यासाठी लांबचा, थकणारा प्रवास करतात. वर्षानुवर्षे ही कुटुंबे उन्हात, पावसात आणि समाजाच्या तिरस्कारपूर्ण नजरेत उभे राहून आपल्या व्यक्तीची वाट बघतात. या उपक्रमातून आम्ही या कुटुंबीयांना एवढंच सांगू इच्छितो की, आम्हाला तुमची काळजी आहे आणि तुम्हालाही सन्मान मिळायला हवा.' सायबेज फाऊंडेशनमध्ये आमचे प्रयत्न नेहमी वास्तवतेला धरून, आणि परिणाम साधणारे असतात. हा प्रकल्प या तत्त्वज्ञानाचे एक प्रतिबिंब आहे.

# वैष्णवी हुंडाबळी प्रकरणावरून राज्यभर संतापाची लाट

## भाजपाकडून हगवणेंच्या विरोधात तीव्र आंदोलन






### फरार बाप-लेकास अटक

सासरच्या त्रासाला कंटाळून पुण्यातील वैष्णवी हगवणेने टोकाचे पाऊल उचलले. जमीन खरेदी करण्यासाठी पैशाची मागणी केल्यानंतर ते न दिल्याने वैष्णवीचा शारीरिक व मानसिक छळ करून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी पती, सासू व नणंद यांना पोलिसांनी अटक केली होती. मात्र, सासरा आणि दीर फरार होते. त्यांना पकडण्यात पुणे पोलिसांना यश आले.

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

जिल्ह्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी आणि छळ प्रकरणावरून राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. वैष्णवीच्या कुटुंबीयांना सासरच्या लोकांनी फोन करून तिने आत्महत्या केल्याची माहिती दिली. मात्र, प्रत्यक्षात वैष्णवीचे घरचे हॉस्पिटलमध्ये पोहोचले असता तिच्या अंगावर असंख्य जखमा दिसून आल्या. हे प्रकरण समजता अजित पवारांनी या घटनेची दखल घेत पोलिसांना आदेश दिले. शुक्रवारी फरार राजेंद्र हगवणे आणि त्यांच्या मुलाला पहाटेच्या सुमारास अटक करण्यात आली आहे. तसेच सरकारी वकिलांनी यावेळी वैष्णवीची आत्महत्या नसून हत्या झाली असल्याचा दावा केला. पीडिताच्या हातावर, पायावर मारहाणीच्या खुणा आहेत. गळ्यावर देखील व्रण आहेत. हत्या की आत्महत्या याचा तपास करायचा आहे. याला वेळ लागणार आहे, त्यामुळे पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली, तर वैष्णवीला शशांकने पाइपने मारहाण केली होती. पोलिसांनी तो पाइप ही जप्त केला आहे. या अटकेनंतर आता भारतीय जनता पार्टी शहर महिला आघाडीच्या वतीने पुण्यातील आरोपी राजेंद्र हगवणे व त्याचा मुलगा शशांक हगवणे यांच्याविरुद्ध शिवाजीनगर कोर्ट परिसरात आंदोलन सुरू करण्यात आले. पोलिसांनी अटकेनंतर हगवणे पिता-पुत्राला न्यायालयात हजर केले. तत्पूर्वीच महिलांनी आक्रमक होत ज्या गाडीतून हगवणे पिता-पुत्रास कोर्टात आणण्यात आले, तेव्हा त्यांच्या अंगावर टोमॅटो फेकण्याचा प्रयत्न झाला.

### ● शाब्बास माझ्या वाघीणींनो...

दरम्यान वैष्णवी हगवणेचे मारेकरी तिचा सासरा राजेंद्र हगवणे दीर सुशील हगवणेला कोर्टात हजर करतांना पुणे भाजपा महिला मोर्चाच्या रणरागिणींनी त्यांच्यातील संतापाला वाट देत यांना फाशीच झाली पाहीजे या घोषणांनी कोर्टाचा परिसर दणाणून सोडला होता. तसेच शाब्बास माझ्या वाघीणींनो असे म्हणत आमदार चित्रा वाघ यांनी भाजपा महिला आंदोलनाचे कौतुक केले आहे.

### ● हगवणे कुटुंबीयांचे वकीलपत्र घेऊ नका

आता कस्पटे कुटुंबीयांनी पुणे बार असोसिएशनला पत्र लिहिले आहे. वैष्णवी कसपटेच्या मृत्यू प्रकरणी आपण कोणीही वकीलपत्र न घेण्याबाबत विनंती अर्ज त्यांनी दिलाय. कस्पटे कुटुंबीयांनी पुणे बार असोसिएशनच्या अध्यक्षांना हे पत्र दिले आहे. १६ मे रोजी झालेली घटना अत्यंत दुखद व महाराष्ट्राला कालिमा फासणारी आहे, तशीच आपणास नम्र विनंती अर्ज करतो की, आपण कोणीही या आरोपीचे वकील पत्र घेऊ नये असे पत्र कस्पटे कुटुंबीयांनी लिहिले आहे. या घटनेला आम्हाला न्याय देण्यास प्रयत्न करावा ही अशी विनंती कुटुंबीयांनी बार असोसिएशनला केली आहे.

### ● "मुलींनो प्रेमविवाह करू नका"

अनिल कस्पटे यांनी तरुणींना एक कळकळीची विनंती केली आहे. ते म्हणाले, मुलींना माझे एक सांगणे आहे. प्रेमात पडताना विचार करून प्रेम करा. समोरच्या व्यक्तीची माहिती काढा. पार्श्वभूमी तपासा, त्याची परिस्थिती काय आहे, वागणूक आणि बोलणं कसे आहे, ते बघा. कुणी तुम्हाला भुरळ घालू नये. अन्यथा माझ्या मुलीसोबत जे घडलं ते तुमच्यासोबत घडू नये. मुलींना एक कळकळीची विनंती आहे. तुम्ही प्रेमात पडू नका. आई-वडिलांचा विचार, सल्ला घेऊन लग्न करा. आई-वडील म्हणतील त्यांच्याशी लग्न करा, असे अनिल कस्पटे यांनी आवाहन केले आहे.

### ● नणंद-भावजयीची एकमेकांविरोधात तक्रार

राज्य महिला आयोगाकडे वैष्णवीची नणंद करिश्मा हगवणे आणि जाऊ मयूरी हगवणे या दोघींनी एकमेकांविरोधात ६ नोव्हेंबर २०२४ रोजी तक्रार दाखल केली होती, असे रुपाली चाकणकर म्हणाल्या. एकाच दिवशी या दोघींनी एकमेकांविरोधात मेलद्वारे तक्रार दाखल केल्यानंतर दुसऱ्या दिवशी लागलीच बावधन पोलीस ठाण्यात यासंदर्भात कारवाई करण्याचे निर्देश दिले होते, असंही चाकणकरांनी स्पष्ट केले. दरम्यान हे प्रकरण कौटुंबिक असल्याने या प्रकरणी समुपदेशनासाठी पोलिसांनी कुटुंबातील सदस्यांना बोलावले होते, असेही चाकणकर म्हणाल्या.

### ● पिंकी ताईची संपूर्ण कुंडली

'करिश्मा हगवणे' ही वैष्णवीची नणंद या प्रकरणात मुख्य आरोपींपैकी एक असल्याचे म्हटले जात आहे. ती हगवणे कुटुंबातील पहिले अपत्य आहे. ती ३४ वर्षांची असून अद्याप अविवाहित आहे. पण घरातले सगळे निर्णय तीच घेते, असे म्हणतात. ती 'पिंकीताई म्हणून ओळखली जाते. वैष्णवीच्या आत्महत्येपूर्वी करिश्माने तिला धमकावले आणि त्रास दिला, असा आरोप आहे. संपूर्ण घराचा कंट्रोल हा करिश्माच्या हातात होता.

### ● गौतमी पाटीलला बैलासमोर नाचवले!

हगवणे कुटुंबीयांच्या लाडक्या बैलाच्या वाढदिवशी त्यांनी चक्क गौतमीला बैलासमोर नाचवले होते. त्याचे व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील तरुणाईला वेड लावणारी गौतमी पाटील एका बैलासमोर नाचत होती. गौतमी स्टेजवर नाचत असताना नेहमी गर्दी करणारे तिचे चाहते इथे नाहीत, तर चक्क बैल तिथे उभा होता. गौतमीच्या मागे असलेला फोटो हा सुशील राजेंद्र हगवणेचा आहे. सुशील हा वैष्णवीचा दीर होता.

### ● अजितदादांनी घेतली कसपटे कुटुंबाची भेट

राज्यभर गाजत असलेले वैष्णवी हगवणे प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बदनाम होत असल्याने अजितदादा पवार यांनी प्रसार माध्यमांकडे वारंवार खुलासा केला आहे. तसेच लवकरच तुम्हाला भेटण्यास येतो असे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी शुक्रवारी वैष्णवी हगवणे यांचे आई-वडील राहात असलेल्या वाकड येथील राहत्या घरी भेट भेऊन सांत्वन केले. यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक मयूर कलाटे, पुणे महापालिका माजी स्थायी समिती सभापती बाबूराव चांदेरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

केवळ ९९ रुपयांमध्ये प्रवासाची संधी

# फ्लिक्सबस इंडियाची नागपूर-पुणे सेवा सुरू




◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

प्रवास तंत्रज्ञान आणि किफायतशीर वाहतुकीमध्ये जागतिक अग्रणी असलेल्या फ्लिक्सबसने आपल्या आंतरशहरी बस नेटवर्कचा विस्तार करत नवीन नागपूर-पुणे मार्गाची घोषणा केली आहे. २३ मे २०२५ पासून, या मार्गावर प्रत्येक शहरातून दररोज रात्री सुटणाऱ्या भारत बेंझ एसी स्लीपरची बस सेवा सुरू होईल. प्रत्येक बसमध्ये ३६ स्लीपर बेड, वातानुकूलन आणि जीपीएस ट्रॅकिंग, तसेच सर्व सीट्ससाठी २-पॉइंट सीट बेल्ट यांसारख्य अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये असतील. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी २४× ७ इन्सिडंट रेस्पॉन्स टीम सुद्धा सज्ज असेल.

या अद्ययावत बसमध्ये आरामदायक बसण्याची व्यवस्था, मोफत वाय-फाय, पॉवर आउटलेट्स आणि वातानुकूलन असेल, जे प्रवासाला सुरक्षित आणि सुखकारक बनवेल. नागपूर-पुणे हा महाराष्ट्रातील सर्वात गजबजलेला प्रवास मार्ग असून, प्रवाशांच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून फ्लिक्सबसने एक आधुनिक आरामदायक आणि परवडणारा पर्याय सुरू केला आहे. फ्लिक्सबस इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सूर्य खुराना म्हणाले, "उत्तर आणि दक्षिण भारतात यशस्वी सेवा दिल्यानंतर, आम्ही आता पश्चिम भारतात आमच्या किफायतशीर आणि आरामदायक सेवा विस्तारत आहोत. नागपूर-पुणे मार्गाच्या शुभारंभासह, देशभरातील शहरे एकमेकांशी सुरक्षित, शाश्वत आणि नावीन्यपूर्ण मोबिलिटी सोल्युशन्स द्वारे जोडण्याच्या आमच्या मिशनमध्ये आणखी एक पाऊल टाकत आहोत"

फ्लिक्सबस इंडिया संपूर्ण देशभर आपले नेटवर्क वेगाने विस्तारत आहे. आजपर्यंत कंपनीने ७७ मार्गांवर ३००+ शहरे १७० + बसद्वारे जोडली आहेत आणि २६ स्थानिक भागीदारांशी सहकार्य केले आहे. या नवीन नागपूर – पुणे मार्गावर, कंपनी मर्यादित कालावधीसाठी केवळ ₹ ९९ मध्ये प्रवास करण्याची खास ऑफर देत आहे. प्रवासी फ्लिक्सबसची वेबसाइट किंवा मोबाईल ॲपद्वारे डिजिटल बोर्डिंग पास, रिअल-टाइम बस ट्रॅकिंग, आणि उदार बॅगेज अलाउन्ससह तिकीट सहज बुक करू शकतात.

### फ्लिक्सबस विषयी

फ्लिक्सबस ही एक आघाडीची जागतिक ट्रॅव्हल-टेक कंपनी आहे, जी चार खंडांतील ४०+ देशांमध्ये दीर्घ अंतराच्या बस आणि ट्रेन प्रवास सेवा देते. २०१३ पासून, फ्लिक्सने युरोप, उत्तर अमेरिका आणि तुर्कीएमध्ये आपले वर्चस्व निर्माण केले आहे आणि आता दक्षिण अमेरिका व आशियामध्ये विस्तार करत आहे. भारतात, फ्लिक्सबस ३००+ शहरे ७७ मार्गांवर १७० + बसद्वारे जोडते. कंपनीचा नावीन्यपूर्ण टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्म आणि ॲसेट-लाइट मॉडेल सुरक्षित, आरामदायक आणि किफायतशीर प्रवास सुनिश्चित करतो.

## वेचक

### बंदिशी, चित्रांतून उलगडणारा आज 'रामगान'



**पुणे :** रामायणातील राम जन्मापासून ते रावणवध करून अयोध्येला परत आल्यावर झालेला राज्याभिषेक इथपर्यंत विविध प्रसंगावर आधारित रचलेल्या बंदिशींचे सादरीकरण आणि त्याच बंदिशींवर रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन असा अनोखा कलाविष्कार 'रामगान : दृक-श्राव्य' कार्यक्रमातून पुणेकर रसिक, श्रोत्यांना अनुभवता येणार आहे. पंधरा बंदिशींतून, चित्रांतून 'रामगान' रामायणातील अंतरंग उलगडणार आहे. पुण्यातील 'आविष्कार क्रिएशन्स' प्रस्तुत हा कार्यक्रम भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत शनिवारी (ता. २४) सायंकाळी ५.३० वाजता सेनापती बापट रस्त्यावरील भारतीय विद्याभवनच्या नातू सभागृहात होणार आहे, अशी माहिती गायिका, चित्रकार व कार्यक्रमाच्या संकल्पक भाग्यश्री गोडबोले यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे पुणेकर रसिकांना कान तृप्त करण्याची आणि डोळ्याचे पारणे फिटेल, असा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच ही आगळीवेगळी दृक-श्राव्य मैफल सर्वांसाठी विनामूल्य खुली असणार आहे.

### 'जरा तरी डाऊट आला, तर तक्रार करा'

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड येथील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. नववधूंना आजही हुंड्याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करावी लागते, या विदारक दृष्य असल्याचे महाराष्ट्रातील नागरिक म्हणत आहेत. यामुळे प्रेमविवाह किंवा ठरवून लग्न करणाऱ्या मुलींच्या मनात भीतीचं घर निर्माण झाले आहे; परंतु, अशा साशंक मुली आणि नववधूंसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाचे आवाहन केले आहे. ते शुक्रवारी माध्यमांशी बोलत होते. "ज्या मुलीची दुःखद घटना घडली आहे, तिच्या वडिलांशी बोललो. मी आज कोल्हापुरातील कार्यक्रम उरकून पुण्यातील त्यांच्या घरी भेटायला जाणार आहे. या दोघांचं लव्ह मॅरेज झाले होते. त्या मुलीने मला सांगितले असते की मला असा असा त्रास होतोय, तर आपण ताबडतोब कारवाई केली असती", असे अजित पवार माध्यमांना म्हणाले. ते पुढे म्हणाले, "माझे मुलींना आवाहन आहे की, वधू म्हणून कोणत्याही कुटुंबात जाता तेव्हा जरा तरी डाऊट आला तर त्यांनी तक्रार करावी. यावर ताबडतोब कारवाई केली जाईल. इतकी मोठी वेळ कोणावरही येणार नाही."



**उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून नववधूंसाठी सूचना**

### अवकाळीमुळे शेतकरी हवालदिल

**पुणे :** आंबेगाव तालुक्यात शेतकऱ्यांनी तीन हजार ७५० एकर क्षेत्रात उन्हाळी बाजरीचे पीक घेतले आहे. गेल्या १५ दिवसापासून सतत वादळी वाऱ्यासह अवकाळी मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे काढणीला आलेले बाजरी पीक जमीनदोस्त झाले आहे. काही ठिकाणी कणसांना कोंब फुटले आहेत. दिवसेंदिवस नुकसानीत वाढ होत असल्याने बाजरी उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. वादळी वारा आणि विजेच्या कडकडाटासह झालेल्या पावसाने बाजरी पीक जमीनदोस्त केले. सतत कोसळत असलेल्या पावसाने शेतात पाणी साचत आहे. त्यामुळे बाजरी पिकाची काढणी खोळंबली आहे. काही शेतकऱ्यांनी काढणी केलेली कणसे झाकून राहत असल्याने त्यांना बुरशी आली आहे, तर गुरांसाठी चारा म्हणून वापर करण्यात येणारे सरमाड (वैरण) कुजू लागली आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

# पालिकेने दिली देखभाल, दुरुस्ती खर्चास मंजुरी

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

पिंपरी-चिंचवड पालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत थेरगाव येथील महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या १०० बेडेड मल्टी- डिझाईन बिल्ड फायनान्स ऑपरेट मल्टी स्पेशालिसटी कॅन्सर रुग्णालय सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी.) तत्वावर सुरु करण्याबाबत, क्रांतीवीर चापेकर स्मारक लोकार्पण कार्यक्रम, मिळकत कर संगणक प्रणाली देखभाल दुरुस्तीसाठी तीन सॉफ्टवेयर डेव्हलपर, शहर कृती आराखडा प्राथमिक सर्वेक्षण व गट चर्चा करणे, ड, ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तसेच भोसरी शांतीनगर, दिघी बोपखेल, पिंपळे गुरव, परिसरात नवीन पाइपलाइन टाकणे, वॉल्व्ह बसविणे, जलशुद्धीकरण केंद्रावरील गाळ काढणे, कला शिक्षकांचे वेतन, कासारवाडी येथील डॉ. अल्लामा इक्बाल विद्यालयात डिजिटल क्लासरूमसाठी यंत्रणा खरेदी, अमृता टेक्नोलोजी यांना हेल्थ केअर सिस्टीम देखभाल व दुरुस्ती साठी मुदतवाढ देणे, प्रभाग ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क पर्यंत रस्ता बनविणे, अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मोहन नगर, काळभोरनगर, चिंचवड स्टेशन, दत्तवाडी, आकुर्डी, विवेकनगर, विठ्ठल मंदिर, इतर परिसरात जलनिस्सारण नालीकांची दुरुस्ती व नव्याने चेंबर बांधणे, फ क्षेत्रीय कार्यालयातील ड्रेनेज वाहीण्यासाठी खोदलेले चार दुरुस्तीसाठी मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

तसेच युडीसीपीआर २०२० अंतर्गत विकास शुल्क व प्रशमन शुल्क दर आकारणीस मान्यता व शहराच्या ४० % भागात पाणीपुरवठा योजना राबविणे यासाठी शासनाकडून निधी न मिळाल्यास मनपा फंडातून खर्च करण्यासाठी निधी वर्ग करण्यास देखील आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

# 'पीएमपी'चे तीन लाख प्रवासी वाढविण्याचे ध्येय

◆ पुणे (वार्ताहर):

'पीएमपी'तून सुमारे साडेबारा लाख प्रवासी रोजचा प्रवास करतात. तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसमधील प्रवाशांची संख्या पुढील तीन महिन्यांत प्रतिदिवस १५ लाखांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट 'पीएमपी' प्रशासनाने निश्चित केले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी 'आपली सेवा, आपली जबाबदारी' या धोरणानुसार 'पीएमपी'च्या व्यवस्थापक संचालक तथा अध्यक्षा दीपा मुधोळ-मुंडे यांनी स्वतः पीएमपीतून प्रवास करून त्रुटी जाणून घेऊन मार्गिकाविस्तार, नवीन मार्गिका आणि अमलात



असलेल्या सेवांची दुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी'तून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीएच्या) हद्दीमध्ये २०२२-२३ पर्यंत प्रतिदिन साडेदहा लाख प्रवासी प्रवास करीत होते. सध्या हा आकडा साडेबारा लाखांपर्यंत गेला आहे. प्रवाशांना अधिकाधिक सेवा देऊन 'पीएमपी'ला सक्षम करण्यासाठी उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

''पीएमपी'च्या ताफ्यात नव्याने एक हजार पर्यावरणपूरक बस दाखल करण्यास टप्प्याटप्प्याने सुरुवात झाली आहे. या बसच्या दर्शनी भागावर डिजिटल पाट्या, ई-तिकीट, ज्येष्ठ आणि महिलांसाठी विशेष सुविधा, मार्गिकांचा विस्तार, नवीन मार्गिका, बसची वेगमर्यादा, प्रवाशांच्या सूचना-तक्रारींचे निराकरण, तातडीची सेवा आदींबाबत नियोजन सुरू केले आहे.


### एक दिवस पीएमपीतून प्रवास करण्याबाबत परिपत्रक

पीएमपीच्या प्रत्येक आगार प्रमुखांसह व्यवस्थापन विभागातील प्रत्येक अधिकाऱ्यांना आठवड्यातून एक दिवस पीएमपीतून प्रवास करण्याबाबत परिपत्रक काढले आहे. मागील काळातही अनेक संचालक, व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांनी असा प्रवास केला आहे. मात्र, नवीन परिपत्रकानुसार प्रत्येक अधिकाऱ्याच्या प्रवासाची नोंद ठेवण्यात येणार असून, उद्दिष्टपूर्तीबाबत सूचना अभिप्रायानुसार कामकाज केल्याचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

# दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

◆ पुणे (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २४ जून ते ८ जुलै ये कालावधीत घेतली जाणार आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाने ५ मे रोजी बारावीचा, तर १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर केला. या परीक्षांतील अनुत्तीर्ण, एटीकेटी प्राप्त विद्यार्थी, श्रेणी सुधार करू इच्छिणारे विद्यार्थी यांना संधी मिळण्यासाठी पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. आतापर्यंत पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये घेतली जात होती. मात्र, यंदा ही परीक्षा लवकर घेतली जाणार आहे. सविस्तर वेळापत्रक https://www.mahahsscboard.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. परीक्षेपूर्वी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून तारखांची खात्री करून घ्यावी. अन्य संकेतस्थळांवरील, अन्य यंत्रणेने छपाई केलेले, अन्य माध्यमांतील वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २४ जून ते ११ जुलै या कालावधीत बारावीची प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. बारावीच्या माहिती तंत्रज्ञान आणि सामान्यज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने अनुक्रमे १५ जून, १६ जून रोजी घेतली जाणार आहे. तर २४ जून ते ८ जुलै या कालावधीत दहावीचे प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन केले जाणार आहे.



### दिवे परिसरात टोमॅटो बांधणीला वेग

**पुणे :** पुरंदर तालुक्यातील दिवे, सोनोरी, वनपुरी परिसरात उन्हाळी हंगामात लागवड केलेल्या टोमॅटोची बांधणी करण्यात येथील शेतकरी व्यस्त असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मजूर टंचाईमुळे इर्जिक पद्धतीने ही कामे करण्याला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. उन्हाळी हंगामात १ मे तसेच पावसाळी हंगामात १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टदरम्यान बरेच शेतकरी टोमॅटोची लागवड करतात. या दरम्यान लागवड झालेल्या टोमॅटोला हमखास बाजारभाव मिळत असतो, असा बऱ्याच वर्षांचा अनुभव इथल्या शेतकऱ्यांना आहे.

## पुणे पुस्तक जत्रेचा थाटात शुभारंभ

# बाल पुस्तक जत्रा उपक्रम राज्यभरात व्हावा : उदय सामंत

◆ पुणे (प्रतिनिधी) :

मुलांना वाचनाची गोडी लावणारी बाल पुस्तक जत्रा ही पुण्यापुरती राहता कामा नये, तर तिचा प्रसार राज्यभरात व्हायला हवा. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात बाल पुस्तक जत्रेचे आयोजन व्हायला हवे. त्यासाठी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून पाठपुरावा करणार आहोत, अशी माहिती राज्याचे उद्योग मंत्री आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. राष्ट्रीय पुस्तक न्यास, पुणे पुस्तक महोत्सव, पुणे महानगरपालिका आणि संवाद पुणे



यांच्या वतीने आयोजित पुणे बाल पुस्तक जत्रेच्या उद्घटनाप्रसंगी उदय सामंत बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, महापालिकेचे अधिकारी सुनील बल्लाळ, राजेश कामठे, ज्येष्ठ उद्योजक कृष्णकुमार गोयल, बुलढाणा अर्बन को क्रेडिट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, लेखिका संगीता बर्वे, ज्येष्ठ चित्रकार ल. म. कडू, बालसाहित्यकारराजीव तांबे, संवाद पुणेचे सुनील महाजन, प्रसेनजित फडणवीस आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या स्मृतिपित्त उभारलेल्या जालनाचे उद्घाटन करण्यात आले. या दालनात प्रकाशकांची साधारण ७० पुस्तकांची दालने असून, त्यात बालसाहित्याला वाहिलेल्या दालनांचा समवेश आहे.

सामंत म्हणाले की, पूर्वीची लहान मुले आणि आताची लहान मुले यांच्यातील फरक आपला स्पष्ट जाणवतो. पूर्वीच्या मुलांना आजार होत नाही, तर आताच्या मुलांची प्रकृती फार लवकर बिघडते. पुस्तकांची जत्रा नावीन्यपूर्ण उपक्रम असून, त्याला जोड भारतीय पारंपरिक खेळांची दिल्याने मुलांसोबतच पालकांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. हा उपक्रम पुढे नेण्यासाठी मराठी भाषेला पाठबळ देणारा मित्र उदय सामंतसोबत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आहेत. त्यामुळे पुणे पुस्तक बालचत्रेसारखे उपक्रम राज्यभरात उत्साहाने पडावेत, अशी इच्छा सामंत यांनी व्यक्त केली. पांडे म्हणाले की, दिल्ली येथे भरणाऱ्या येथे वर्ल्ड बुक फेअरमध्ये मुलांसाठी शैक्षणिक आणि साहित्यिक उपक्रम राबविण्याबाबत कल्पना सुचली. या कल्पनेचे पुणे पुस्तक बाल जत्रेत रूपांतर करण्यात आले. पुणेकरांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भरभरून प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे येत्या रविवारपर्यंत पुणे पुस्तक बाल जत्रेला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन पांडे यांनी केले.

# पुणेकरांना अनुभवता येणार नृत्यप्रवास

◆ पुणे (प्रतिनिधी) :

नवोदित तरुण नर्तकांना व नृत्य दिग्दर्शकांना आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनांसह प्रयोग करण्यासाठी, सर्जनशीलतेच्या सीमा ओलांडत काही नवीन सादरीकरण करण्यासाठी याबरोबरच पारंपारिक म्हणींच्या दृष्टिकोनातून आपला स्वतःचा असा वेगळा दृष्टिकोन प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने ज्येष्ठ कथक गुरु शमा भाटे यांच्या नाद-रूप कथक संस्थेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या मॅडम मेनका कोरिओग्राफी मूव्हमेंट अंतर्गत शनिवार दि. २४ व रविवार दि. २५ मे रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



आहे. टिळक रस्त्यावरील हिराबाग चौकातील ज्योत्स्ना भोळे सभागृह या ठिकाणी दोन्ही दिवशी सायं ५.३० नंतर सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यासाठी सर्वांना विनामूल्य प्रवेश देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. महराष्ट्र कल्चरल सेंटरच्या सहयोगाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तर अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिनास्थित माधव व रमा मांजरेकर यांच्या तौर्य या संस्थेची मदतही कार्यक्रमास लाभली आहे. यावर्षीच्या कार्यक्रमामध्ये अभिषेक धावडे, जुई देशिंगकर, इशा काठवते, विद्या धिडे यांसोबतच आणि प्रचिती भावे व श्रद्धा मुखडे हे त्यांनी दिग्दर्शित केलेली सादरीकरणे उपस्थितांसमोर प्रस्तुत करतील. तसेच आदिती मंगलदास या ज्येष्ठ नृत्यांगना व जगप्रसिद्ध नृत्य-संरचनाकार असून यांचे विशेष व्याख्यान देखिल यावेळी संपन्न होईल. आपला नाविन्यपूर्ण नृत्यप्रवास या विषयावर त्या उपस्थितांशी संवाद साधतील.

# शिवसेना तिरंगा रॅलीला प्रतिसाद

नियोजन | मंत्री संजय शिरसाटांनी दाखविला हिरवा झेंडा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: नापाक पाकचे मनसुबे उद्धवस्त करणारे ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ काल शनिवार दि २४ मे २०२५ रोजी दु. १२: ०० वाजता महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली. या तिरंगा रॅलीत बीडवासियांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर या रॅलीत युवकांनी ट्रॅक्टरमध्ये सैनिकांची वेशभूषा परिधान करून आपले देशप्रेम व्यक्त केले. याबरोबरच असंख्य तरुण हाती तिरंगा झेंडा घेऊन भर पावसात भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देत मोटारसायकलवर स्वार झाले.

मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांनी सर्वो प्रथम विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. यानंतर लागलीच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह तिरंगा रॅलीत सहभागी झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही भव्य रॅली काढण्यात आली. सर्वांनी मिळून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि नंतर सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी आपल्या प्राणांची तमा न बाळगता लढणाऱ्या भारतीय सैन्याला अभिवादन करण्याकरिता भर पावसात बीडमधून प्रतिष्ठित नागरिक तथा असंख्य तरुण राष्ट्रीय ध्वज हाती घेऊन रॅलीत सहभागी झाले होते, यावरून बीडकरांच्या निस्सीम देशभक्ती आणि देशप्रेमाचे दर्शन घडून आले. याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोकपटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, पान २ वर








बीड:महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट बीड दौऱ्यावर आले असता सामाजिक कार्यकर्ते ॲड. राजेश शिंदे यांनी त्यांची भेट घेतली.

# कार्यकर्तृत्वाची यथोचित दखल

अभिनंदनिय: तुळशीराम वाघमारे यांची निवड



पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार २३ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ(मुंबई)ची महत्वपूर्ण बैठक राज्याचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली तसेच पत्रकारांच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी सर्वांच्या उपस्थितीत पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या गेवराई तालुकाध्यक्ष पदी तुळशीराम वाघमारे यांची निवड करण्यात आली .निवड होताच सर्वांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले तसेच दैनिक सूर्योदय कार्यालय बीड याठिकाणी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर,दैनिक सूर्योदय चे मुख्य संपादक गंगाधर (नाना ) काळकुटे,कार्यकारी पान २ वर

# ग्रामपंचायत निवडणुकीचे बिगुल

पडघम:युवकांना राजकारणात येण्याची संधी

पुण्यभूमी प्रतिनिधी




पाटोदा: तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून, गावपातळीवर सत्तांतराची चाहूल लागली आहे. प्रशासनाकडून निवडणुकांच्या पूर्वतयारीला गती मिळाल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीचा बिगुल कधीही वाजू शकतो.ग्रामपंचायती या गावच्या विकासाचे पहिले पाऊल असतात. त्यामुळे या निवडणुकांकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. विशेषतः तरुण पिढीसाठी ही एक सुवर्णसंधी असून, विकासाच्या नव्या कल्पना आणि नेतृत्वगुणांची चाचणी घेण्याची ही योग्य वेळ आहे.

राजकारणात युवकांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज झाली आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, शेतीविषयक धोरणे – या सगळ्यांमध्ये तरुण नेतृत्व नवे दृष्टिकोन घेऊन येऊ शकते. अनेक युवकांनी आतापासूनच आपापल्या गावात जनसंपर्क सुरू केला असून, काही ठिकाणी गट तयार होण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे.सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे आजचा युवक जागरूक आहे.भ्रष्टाचारविरहित व पारदर्शक कारभार करणे, निधीचा योग्य वापर करणे, गावात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी नवतरुण पुढे येत आहेत. पाटोदा तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुका केवळ राजकीय सत्तापरिवर्तनाचे साधन न राहता,तरुणांच्या सहभागामुळे सामाजिक बदलाचे माध्यम ठरतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बीडच्या युवासैनिकांना स्कॉर्पिओ भेट

कामाचे फळ: बाजीराव चव्हाणांच्या कार्यकर्त्यांची दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या कार्याला प्रेरित होऊन महाराष्ट्रातील युवा मोठ्या प्रमाणात युवा सेनेत दाखल होताना दिसून येत आहेत. युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मराठवाड्यात वाढत असलेला युवा सेनेचा विस्तार युवकांसाठी आज प्रेरणा देणारा आहे. मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड जिल्हात युवासेनेचा आवाका वाढत चालला आहे. याच कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड मधील युवा सैनिकांनी युवा सेना वाढवण्यासाठी बाजीराव चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून युवासेना वाढववली. आज बाजीराव चव्हाण यांच्या तालमीत वाढलेले मेहनती एकनिष्ठ असलेले चार युवासैनिक यांचे चांगले कार्यपाहून त्यांना युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्यामार्फत चार स्कॉर्पिओ गाड्या भेट देण्यात आल्या आहेत. गाड्या भेट देताना प्रमुख उपस्थितीत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट साहेब, हर्षदाताई सिरसाट, तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण साहेब, यांच्या उपस्थितीत बीडच्या चार निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्कॉर्पिओ गाड्या आज भेट देण्यात आल्या आहेत. यावेळी उपस्थित युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे पान २ वर

# जागतिक परिचारिका दिन

उपक्रम:गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ




पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:संपूर्ण जगामध्ये स्वास्थ्य व्यवस्थेतील परिचारिकांचे उल्लेखनीय महत्त्व व अतुल्य योगदान याची दखल घेण्यासाठी इसवी सन १८५४ पासून जागतिक परिचारिका दिन हा साजरा करण्यात येतो. यावर्षी गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग माजलगाव येथे जागतिक परिचारिका दिन, शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या विशेष दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले गेले यामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच त्यानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या बीएससी नर्सिंगच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्र परीक्षेचा निकाल नुकताच लागला या मधे महाविद्यालयाच्या ७५ टक्के निकाल लागला व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी कठीण परिस्थितीशी सामना करत ध्येय आणि चिकाटीच्या जोरावर विशेष पान २ वर

# विजेचा लपंडाव बंद करावा

डॉ. गोपाल बछिर:महावितरण अधिकाऱ्यास दिला इशारा


पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:विजेचा लपंडाव बंद करून प्रवाह सुरळीत करा नसता कार्यालयास ताळे ठोकू याचे परिणाम आपणास भोगावे लागेल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने डॉ. गोपाल बछिरे, गजानन जाधव सर यांनी महावितरण कंपनीच्या अभियंत्यास देण्यात आला. लोणार शहर व ग्रामीण भागामध्ये एक महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू झाला आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे पंखे, कुलर, टीव्ही, मिक्सर, विजेचे दिवे, तसेच विजेचे उपकरण जळून खाक होत आहेत. यास जबाबदार कोण? एक तर संपूर्ण महिन्याचा वीज आकार, वीज भार, इतर सर्व शुल्क ग्राहकांवर लादता, त्याचबरोबर महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे वीज ग्राहकांचे अतोनात नुकसान होत आहे, याला सर्वस्व महावितरण कंपनी व त्या कंपनीने आपल्या सारखे बेजबाबदार अभियंता नियुक्ती केली आपण स्वतः जबाबदार आहात आपणास ताकीद देण्यात येते विना विलंब त्वरित वीज प्रवाह सुरळीत करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या पावर हाउस कार्यालयास ताळे ठोकण्यात येईल याची गांभीर्याने पान २ वर



# केवड पींप्री मार्गाचे काम अर्धवट?

बोंबला:गुत्तेदार काम अर्धवट सोडून फरार!



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: केज तालुक्यातील केवड ते प्रिंप्री ग्रामीण मार्गाचे काम अर्धवट करण्यात आले असून नागरिकांना खुप मोठा पावसाळ्यात सामना करावा लागतो आहे व मुंडे आडनावाचा गुत्तेदार काम अर्धवट सोडून फरार झाला आहे की काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण शाळेतील येणाऱ्या जानाऱ्या विद्यार्थ्यांना काम अर्धवट करण्यात आले त्या ठिकाणी चिखलातुन जाने येणे सुध्दा आवगड झाले आहे जाता येत नाही आणि येताही येत नाही त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत जास्त पाऊस झाला तर केवड ते प्रिंप्री ग्रामीण मार्ग ठप्प होत आहे मग कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून थोड्या कामासाठी अर्धवट कामामुळे निधी पाण्यात घालणाऱ्या मुंडे आडनावाच्या गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले कारण असे गुत्तेदारांचा काय उपयोग काम अर्धवट सोडून फरार होतात नंतर तीकडे फिरकत पन नाही निधी हडप करुन फरार होणाऱ्या मुंडे आडनावाच्या गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

सरपंच जनाबाई काकडे | एआरटी संस्थेचा पुढाकार

# साबला येथील शेतशिवर झाला पाणीदार

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील मौजे साबला येथील पूर्ण शेतशिवार पाणीदार करण्याचे काम क्शन रूरल टेक्नॉलॉजी संस्था , यवतमाळ . या संस्थेने केला आहे . साबला ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ . जनाबाई काकडे यांच्या विनंतीला मान देऊन . एआरटी संस्थेचे संस्थापक / अध्यक्ष माननीय. सुहासराव धस . जलसंधारण तज्ञ माननीय पवनराव नखाते , प्रकल्प व्यवस्थापक माननीय वली तांबेळी प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योती सांबरे , पोकलेन ऑपरेटर सोनुकुमार चंद्रवंशी , दिलीपकुमार चंद्रवंशी या सर्वांच्या नेतृत्वाखाली मौजे साबला नगरितील नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि रुंदीकरण , त्यामध्ये पाणी अडवण्यासाठी , पाणी जमिनिमध्ये मुरवण्यासाठी कमीत कमी पाच पुट व जास्तीत जास्त सात पुट खोल असे बॉक्स बनवण्यात आले आहेत . त्या प्रत्येक बॉक्समध्ये वीस मिटर अंतरावर वीस पुट खोल असे बोरच्या मशिनने बोर घेतले आहेत . तसेच त्यामध्ये ठराविक अशा अंतरावर साखळी बंधारे बांधण्यात आले आहेत . साबला शेतशिवारात पडलेल्या पावसाचे पाणी साबला शेत शिवारातच राहिले पाहिजे . अशा प्रकारचे काम हे एआरटी या संस्थेने केले आहे . हे केलेले काम चांगल्या प्रकारे कसे राहील याची काळजी ही एआरटी संस्थेच्या सर्व कर्मचारी सहकारी कमिटीने केले आहे . या गावातील सर्व शेतकरी , शेतमजूर , प्राणी , पक्षी या सर्वांना याचा फायदा कसा होईल याचा विचार करून निर्णय घेतला आहे . आणि हे सर्व काम व्यवस्थित पणे केले आहे. पान २ वर



# माजी सभापतींच्या निवासस्थानी भेट



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज शहरात खा.बजरंग बप्पा सोनवने यांच्या भाच्चीच्या लग्ना निमित्त आ. सुरेश धस आले होते त्यांनी केजच्या संतोष आन्ना देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठवणारे कार्यकत्यांच्या घरी केज शहरामधे विविध ठिकाणी भेटी दिल्या त्यांचे सर्वानी स्वागत शब्द सुमानाने केले त्यांनी संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपीना जो पर्यत शिक्षा होत नाही तो पर्यत हारतुरे घेण्यास स्पष्ट नकार दिला.

माजी सभापती पान २ वर